मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ६१ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च २००५

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## मराठे प्रतिष्ठानचे आठवे अखिल भारतीय संमेलन
## गोमंतक मराठे परिवारातर्फे खास निमंत्रण

मित्रहो,

गोमंतकातील मराठे कुलबंधूनी सन १९८० मध्ये ढवळी, फोंडा येथे २६, २७ जानेवारीला पहिले संमेलन आयोजित करून मराठे प्रतिष्ठानची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर मुळगाव, डिचोली-गोवा येथे सन १९८६ मधे दुसरे संमेलन घेतले आता **गोमंतकातील तिसरे संमेलन** (रौप्यमहोत्सवी वर्षाचे समारोपाचे संमेलन) **दि. ३० एप्रिल शनिवार व १ मे २००५ रविवार** या दिवशी साजरे करण्याचे ठरविले आहे.

खऱ्या अर्थाने हे संमेलन कौटुंबिक व घरगुती व्हावे व चित्पावनी ब्राह्मणांची जीवनपद्धती जवळून पाहाता यावी या दृष्टीने हे संमेलन पंचतारांकित निवासगृहे असलेल्या मोठ्या शहरात आयोजित न करता **पुरुषोत्तम विष्णु मराठे यांचे घरी - मु. बिंबल, पो. खातोडे, ता. सत्तरी, गोवा - ४०३ ५०६ येथे आयोजित केले आहे.** (फोन : ०८३२-२३७८२३४)

संमेलनाची वर्गणी **सहा वर्षावरील सर्वांसाठी माणशी रु. २००** निश्चित केली आहे. बाहेगावाहून येणाऱ्या प्रतिनिधींची निवासाची घरगुती व्यवस्था (चटई, उशी, चादर) व गोमंतकीय पद्धतीचे रुचकर घरगुती जेवण असेल. स्नान करण्यासाठी तळी, विहीर व न्हाणीघर यांची सोय असेल.

मराठे परिवारातून इतर परिवारात गेलेल्या आपल्या माहेरवाशिणींनाही या संमेलनाला अगत्य घेऊन यावे. सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्या प्रतिनिधींनी आपल्या कार्यक्रमाचे स्वरूप व त्यासाठी लागणारा वेळ कळवावा. संमेलनाला येणाऱ्या कुलबांधवांनी त्यांच्या सूचना व नावे ३१.३.०५ पर्यंत कळवावी.

**आपले विश्वासू,**

**संमेलन आयोजन समिती,**

**गोमंतक परिवार यांचेसाठी**

कालिदास बाळकृष्ण मराठे, **प्रमुख आयोजक**
सदाशिव नारायण मराठे, **स्वागताध्यक्ष**
सौ. अपूर्वा अरुण मराठे, **संयुक्त कार्यवाह**
शुभदा दीपक मराठे, **संयुक्त कार्यवाह**
प्रदीप अनंत मराठे, **संयुक्त कार्यवाह**
प्रसाद (विष्णु) वसंत मराठे, **संयुक्त कार्यवाह**

**मराठे प्रतिष्ठान, प्रभादेवी,**

**मुंबई यांचेसाठा**

आनंद यशवंत मराठे, **कार्याध्यक्ष**, ठाणे
मोहन सदाशिव मराठे, **कार्यवाह**, खार, मुंबई

### संपर्क: पत्ते व फोन (STD 0832)

१) कालिदास बाळकृष्ण मराठे, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१ फोन : २३१३८०५
२) सौ. अपूर्वा अरूण मराठे, राजविहार, पुण्याई, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१. फोन : २३१४५४९
३) श्री. प्रदीप अनंत मराठे, मु. पो. वेळगे-पाळी, गोवा ४०३ १०५. फोन : २३५३२६६
४) श्री. प्रसाद (विष्णु) वसंत मराठे पारिजात, गृहनिर्माण वसाहत, हरवळे, सांखळी, गोवा ४०३ ५०५. फोन : ९४२२४४४६२१/२३६५२२१
५) सौ. नीलांबरी मराठे, पुणे. फोन : ४४५६२७०
६) श्री. लक्ष्मण मराठे, मुंबई. फोन : २५६८०१०४

### मार्गदर्शक सूचना

कार्यक्रम ३०.४ ला सकाळी सुरू होत असल्याने २९.४ ला सायंकाळपर्यंत गोव्यात पोचणे सोयीचे होईल. **कोकण रेल्वेच्या गाड्या मागील पानावर** दिल्या आहेत.

गोव्यात शक्यतो **थिवी** (सावंतवाडी नंतरचे स्टेशन) नाहीतर मग मडगांव स्टेशनवर उतरावे. थिवीहून डिचोली-साखळी-वाळपई-खोतोडे मार्गे तसेच मडगांवहून फोंडा-गुळेली-खोतोडे मार्गे बिंबल सुमारे ४०-४२ कि.मी. आहे. खोतोडे स्टँडवर संमेलन स्वयंसेवक/फलक असेल. तिथून बिंबल पायी २० मिनिटांवर आहे.

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

वेबसाईट : www.marathepratishthan.org

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता** कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. त्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतात.

मागील तिमाहीत डिसेंबर ११, जानेवारी ८, आणि फेब्रुवारी १२ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. जमाखर्च, पत्रव्यवहार इ. नेहमीच्या कामाव्यतिरिक्त खालील विशेष काम या सभात झाले.

प्रतिष्ठानचे आठवे संमेलन गोव्यात घेण्यासाठी एप्रिल ३० व मे १ या तारखा ठरविल्याचे गोमंतक मराठे परिवाराकडून कळविण्यात आले होते. या तारखा मान्य असल्याचे त्यांना कळवावे असे ११ डिसेंबरच्या सभेत ठरविण्यात आले. तसेच कार्यकारी मंडळाच्या सभांना पुणे शाखेचे अच्युत महादेव चक्रदेव, श्रीनिवास गोपाळ मराठे आणि सौ. नीलांबरी रमेश मराठे यांना कायम निमंत्रित म्हणून बोलावण्याचे ठरविण्यात आले.

८.१.०५च्या सभेला ब्राह्मण सेवा मंडळ, दादर यांचे पदाधिकारी श्री. लिमये यांना त्यांच्या संस्थेमार्फत सभासदांना कोणत्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात ते जाणून घेण्यासाठी बोलावण्यात आले होते. त्यांनी सांगितले की मुंबईतील नरे पार्कजवळील नाना पालकर हॉस्पिटलमार्फत सवलतीने डायलीसिसची सोय उपलब्ध करून देण्यात येते. तसेच सर्व गंभीर आजारांत डॉक्टरी तपासणी आणि वैद्यकीय समितीच्या शिफारशीनुसार कर्ज दिले जाते. संस्थेच्या हॉलचे नियमित उत्पन्न येते. त्यामुळे अशा कामांसाठी सुमारे ५-६ लाखांचा कॉर्पस फंड संस्थेकडे जमा असल्यामुळे वैद्यकीय मदत, शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना कर्जपुरवठा करणे संस्थेला शक्य होते असेहि त्यांनी सांगितले.

वि. म. ऊर्फ बापुसाहेब करंदीकर हे १२.२ च्या सभेला खास उपस्थित होते. चित्पावन संघाच्या कामकाजात म. प्र. च्या सभासदांचा कसा सहभाग मिळू शकेल याबाबत विचारविनिमय करण्यासाठी ते आले होते. प्रतिष्ठानच्या सभासदांनी व्यक्तिशः चित्पावन संघाचे सभासदत्व न घेता म. प्र. ने चित्पावन संघाचे संस्था सभासदत्व (Corporate membership) घेऊन फेडरल पद्धतीने हा संबंध प्रस्थापित करणे अधिक उचित होईल असे चर्चेत सुचविण्यात आले.

## गोमंतक मराठे परिवार संमेलन

तिसरे गोमंतक मराठे परिवार संमेलन बिंबल, पो. खातोडे, गोवा येथे दि. १६.१.०५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४.३० पर्यंत साजरे करण्यात आले. यावेळी गोमंतकातील कुलबांधव सहकुटुंब उपस्थित होते. एक प्रकारे ही म. प्र. च्या आगामी ८व्या अ. भा. संमेलनाची रंगीत तालीमच होती म्हणा ना! या परिवार संमेलनाचा वृत्तांत याच अंकांत स्वतंत्रपणे दिलेला आहे.

## वर्धापनदिन सोहळा, पुणे (२६.१.०५)

प्रतिष्ठानचा वर्धापन दिन पुणे शाखेतर्फे प्रतिवर्षी थाटामाटात साजरा करण्यात येतो. मागील वर्षी डिसेंबर २००३ मध्ये पुण्यातच ७वे अ. भा. संमेलन झाल्याने वर्धापन दिन सोहळा झाला नव्हता. मात्र २६.१.२००५ रोजी नेहमीच्या प्रथेप्रमाणे पुणे शाखेतर्फे प्रतिष्ठानचा २६वा वर्धापनदिन सायं. ४ ते ७.३० या वेळात साजरा करण्यात आला. सुमारे १०० कुलबंधु भगिनी या वेळी उपस्थित होते. याचा वृत्तान्त याच अंकात स्वतंत्रपणे दिला आहे.

## प्रतिष्ठानचे आठवे संमेलन

प्रतिष्ठानचे आठवे अखिल भारतीय संमेलन गोव्यात ३० एप्रिल व १ मे रोजी होणार आहे. गोमंतकीय मराठे परिवारातर्फे याची तयारी पद्धतशीरपणे चालू आहे. २० फेब्रुवारी रोजी झालेल्या संमेलन आयोजन समितीच्या सभेला **समन्वयक म्हणून** मुंबईहून **हितगुजचे संपादक ल. शं. मराठे** उपस्थित होते. सर्व कुलबांधवांना संमेलन आयोजन समितीतर्फे निमंत्रणपत्रे ८-१० मार्चपर्यंत पोचतील.

## *कोकण रेल्वेच्या मुंबई ते गोवा गाड्या*

| गाडी क्र./नांव | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|
| १) २०५१ - जनशताब्दी | दादर ०५३० | थिवी १२३४, मडगांव १३३० |
| २) ०१०३ - मांडवी एक्स्प्रेस | मुंबई-व्हीटी ०७०० | थिवी १७१४, मडगांव १८४० |
| ३) KR/5 - पॅसेंजर | दिवा ०६२० | थिवी १७५४, मडगांव १९३० |
| ४) २६१८ - मंगला एक्स्प्रेस | पनवेल १००५ | थिवी १८३८, मडगांव १९४५ |
| ५) ६३४५ - नेत्रावती | लो. टि. टर्मिनस ११४० | थिवी २१३२, मडगांव २२४० |
| ६) ०१११ - कोकणकन्या | मुंबई-व्हीटी २३०० | थिवी ०९२४, मडगांव १०४५ |
| ७) २६१९ - मत्स्यगंधा | लो. टि. टर्मिनस १४०५ | थांबत नाही, मडगांव ००२० |

## *८वे संमेलन - कार्यक्रम पत्रिका*

दि. ३०.४.२००५

**स. ९ ते १०** चहा - सभासद नोंदणी, **स. १० ते १२.३०** श्री व्याडेश्वर चरणी लघुरुद्र सेवा, **दु. १२.३० ते १** आरती व तीर्थप्रसाद, **दु. १ ते ३** भोजन व विश्रांती, **दु. ३ ते ४.३०** उद्‌घाटन सोहळा (माहेरवाशिणींचा सन्मान व नववधूंचे स्वागत तसेच ज्येष्ठ व्यक्तींचा सत्कार), **संध्या. ४.३० ते ५** चहा, **संध्या. ५ ते ६.३०** व्याख्यान - दिलीप कुलकर्णी, गतिमान संतुलन यांचे पर्यावरण व संस्कार, **संध्या ७ ते ९** सांस्कृतिक कार्यक्रम (देखणी, फुगडी, समईनृत्य, घुमट आरती वगैरे) **रात्रौ ९ ते १०** भोजन, **रात्रौ १०.३० ते १** दशावतारी नाटक

दि. १.५.२००५

स. ६ ते ७ पहिला चहा, स. ८ ते ९ अल्पोपहार व दुसरा चहा, स. ९ ते १२.३० प्रतिष्ठानपुढील आव्हाने - गटचर्चा/खुली चर्चा, दु. १२.३० ते २.३० स्नेहभोजन, दु. २.३० ते ३.३० चर्चासत्र, दु. ३.३० ते ४ चहा, दु. ४ ते ६.३० समारोप सोहळा (सभासदांचे मनोगत, अध्यक्षीय भाषण), संध्या. ७ ते ९ सांस्कृतिक कार्यक्रम, रात्रौ ९ ते १० भोजन, रात्रौ १० नंतर गोंधळ

**टीप : सोयीनुसार कार्यक्रमात बदल शक्य.**

आयोजकांचे काम सुकर व्हावे म्हणून **कुलबांधवांनी आपण येणार असल्याचे त्वरित कळवावे.**

संमेलनासाठी निधी संकलनाच्या दृष्टीने कुलबांधवांनी आपल्या **उद्योग-व्यवसायाच्या जाहिराती संमेलन स्मरणिकेसाठी पाठवाव्या.** जाहिरातींचे दर :

खास रंगीत पान रु. २००० पूर्ण पान रु. १५००
अर्धे पान रु. ८०० पाव पान रु. ५००
पृष्ठदान प्रत्येक पृष्ठासाठी किमान रु. १०००.

**जाहिरातीसाठी संपर्क** : कृष्णा काशिनाथ मराठे, १३६९, गृहनिर्माण वसाहत, हरवळे, प्रतापनगर, साखळी, गोवा ४०३ ५०५ (फोन : २३६४४२४-रात्रौ ८ नंतर)

### बंगलोरमधील मराठे बांधवांना हवी मुंबईत निवासाची सोय

मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह बंगलोरमध्ये गेले असता त्यांनी तेथील मराठे कुटुंबीयांशी संक्रांतीचे मुहूर्तावर चर्चा केली. या चर्चेचा वृत्तान्त या अंकांत स्वतंत्रपणे दिला आहे. त्यांनी एक महत्त्वाची अपेक्षा व्यक्त केली ती म्हणजे ते कधी मुंबईत आल्यास त्यांची राहण्याची काही सोय प्रतिष्ठानमार्फत कमी खर्चात व्हावी. अन्य गांवांतल्या लोकांचीहि अशी अपेक्षा असावी. यासाठी काय करता येईल **यासंबंधी सदस्यांनी प्रतिष्ठानला जरूर सूचना कराव्या.**

### कै. सुरेशभाऊ मराठे स्मृतिप्रीत्यर्थ सांस्कृतिक कार्यक्रम (२७.२.०५)

प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष कै. सुरेशभाऊ यांचे ५ फेब्रुवारी २००० रोजी दुःखद निधन झाले. त्यानंतर ५ नोव्हेंबर २००० रोजी झालेल्या प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कै. सुरेशभाऊ स्मृति निधी स्थापन करावा आणि त्याच्या व्याजातून प्रतिष्ठानच्या माध्यमातून वर्षातून एकदा तरी सांस्कृतिक कार्यक्रम कै. सुरेशभाऊंच्या स्मृतिदिनी (५ फेब्रुवारी) वा त्याच्या आसपास आखण्यात यावा असा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

त्यानुसार ११ फेब्रुवारी २००१ रोजी प्रभादेवीला मराठे उद्योग भवनात तर १७ फेब्रुवारी २००२ रोजी नालासोपारा येथे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यानंतर २ वर्षे काही ना काही कारणाने असे कार्यक्रम होऊ शकले नाहीत. यंदाच्या ५व्या स्मृतिदिनी मात्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंदराव मराठे यांनी खास पुढाकार घेऊन ठाणे येथे कै. सुरेशभाऊ मराठे स्मृति सांस्कृतिक कार्यक्रम २७.२.२००५ रोजी आयोजित केला. सुमारे शंभर एक कुलबांधव या कार्यक्रमाला उपस्थित होते. याचा वृत्तान्त या अंकात स्वतंत्रपणे देण्यात आला आहे.

### देणग्या

डिसेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५ या तिमाहीत मिळालेल्या रकमांचा तपशील :

**सभासदत्व व हितगुज वर्गणी** : (प्रत्येकी रु. ३००) दीपक नारायण, विलेपार्ले, मुंबई, निशा नरेंद्र पेठे, विलेपार्ले, मुंबई, अविनाश दिवाकर विद्वांस, विरार, जि. ठाणे, उपेंद्र दिगंबर, पनवेल, उमेश दिगंबर, ठाणे, अरुण श्रीकृष्ण, भोपाळ, विजय श्रीकृष्ण, भोपाळ आणि डॉ. स्मृती खरे, अमेरिका (रु. ४५००).

**आजीव सभासद** : (प्रत्येकी रु. १००) गजानन रंगनाथ, बंगलोर आणि शुभदा अविनाश विद्वांस, विरार.

**हितगुज वर्गणी** : रविंद्र मराठे, विरार - रु. १००

**हितगुज जाहिराती** : (डिसेंबर ०४ अंकासाठी) मे. शारदा ज्वेलर्स, मुंबई - रु. २५०१, प्रभाकर दामोदर (पृ.१२०), वडाळा - रु. ६००

***

# सभासद वृत्त

### जागतिक पेटंटधारक अरविंद वासुदेव

**अरविंद वासुदेव** (पृ.३१८) हे मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअर असून त्यांचा चिंचवड, पुणे येथे इंजिनियरिंगचा कारखाना आहे. त्यांना रोल बेडिंग मशिनसाठी जागतिक पेटंट मिळाले आहे. भारतीय पेटंटसाठीहि त्यांनी अर्ज केला आहे. मल्टिपल आऊटपुट गियरबॉक्स साठी पण त्यांनी भारतीय पेटंटसाठी अर्ज केला आहे.

ते २५ x २५०० ३ रोल रोलबेंडिंगचे भारतातील एकमेव उत्पादक असून नुकतेच त्यांनी २५ x २५०० क्षमतेचे मशीन जे. एन. मार्शल कंपनीला पुरविले.

### युवा क्रिकेट संघाचा उपकर्णधार सुशांत

सध्या मुंबईच्या पोद्दार महाविद्यालयात वाणिज्य शाखेत द्वितीय वर्षात शिकणारा **सुशांत हेमंत (पृ.४७१)** हा एक उभरता क्रिकेटपटु आहे. तो यष्टिरक्षक आणि डावखुरा आघाडीचा फलंदाज अशा दोन्ही भूमिका समर्थपणे पेलतो. १४ वर्षाखालील मुंबई संघात १७ वर्षाखालील मुंबई संघात, १७ वर्षाखालील भारतीय संघात, १९ वर्षाखालील मुंबई संघाचा कर्णधार अशी वाटचाल करीत तो आता १९ वर्षाखालील भारतीय संघाचा उपकर्णधार म्हणून नियुक्त झाला आहे. (एकदिवशीय सामन्यासाठी).

क्रिकेटपटु सुशांतचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन आणि त्याची घोडदौड अशीच चालू राहू दे अशा शुभेच्छा.

### विश्वचषक महिला क्रिकेट संघात सौ. दीपा कुलकर्णी-मराठे

अंधेरी, मुंबई येथील कुलबांधव **मंगेश प्रभाकर (पृ.२९२) यांची पत्नी सौ. दीपा मराठे** हिची आगामी विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय महिला क्रिकेट संघात निवड झाली आहे. द. आफ्रिकेत २२ मार्च २००५ पासून या स्पर्धेला सुरवात होणार आहे. दीपा २००० पासून भारतीय संघातून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत असून देशांतर्गत स्पर्धा १९९४ पासून खेळताना तिने अनेकदा बेस्ट बॉलर, बेस्ट फील्डर इव्ह ऑफ द टुर्नामेंट असे पुरस्कार मिळवले आहेत. तसेच १९९४-९५ साली तिला महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कारहि मिळाला आहे. आगामी विश्वचषक स्पर्धेत दीपाला असेच उज्ज्वल यश मिळो अशी सर्व कुलबांधवांतर्फे शुभेच्छा.

### सामाजिक कार्यकर्ती माधुरी मराठे

प्रतिष्ठानचे सदस्य **शंकर दामोदर (पृ.३७०), ठाणे यांची पुतणी माधुरी मराठे** (सदाशिव दामोदर, सिकंदराबाद यांची कन्या) हिला ठाणे येथील भारतीय जीवन विकास परिषदेचा लक्ष्मीबाई केळकर पुरस्कार देण्यात आला. १२५०० रु. रोख, मानचिन्ह आणि साडी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सामाजिक क्षेत्रात निरलसपणे काम करणाऱ्या महिला

कार्यकर्त्यांना दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो.

**आर्किटेक्ट श्रद्धा रामचंद्र**

मुलुंड, मुंबई येथील सभासद **रामचंद्र गोविंद (पृ.५३५) यांची मुलगी श्रद्धा** मुंबईच्या जे. जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमधून मे २००४ मध्ये झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या बॅचलर ऑफ आर्किटेक्चर या परीक्षेत प्रथम श्रेणीत गुणवत्तापूर्वक उत्तीर्ण झाली. श्रद्धाचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

**शशांक श्रीधरला नाट्याभिनय पारितोषिक**

कलावलय आयोजित बी. के. सी. असोसिएशन पुरस्कृत प्रा. शशिकांत यर्नाळकर स्मृति एकपात्री नाट्याभिनय स्पर्धेत खुल्या गटात **वेंगुर्ले येथील शशांक श्रीधर** (पृ.३९६) याने प्रथम पारितोषिक पटकावले. शशांकचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

**सुधाकर बळवंत यांचा अमृत महोत्सव**

**ठाणे येथील सभासद सुधाकर बळवंत** (पृ.१२९) यांच्या वयाला ७५ वर्षे दि. १० ऑक्टोबर २००४ रोजी पूर्ण झाली. याबद्दल अमृतमहोत्सव समारंभ त्यांचे पुतणे गजानन चिंतामण यांच्या पुण्यातल्या घरी साजरा करण्यात आला. त्यांचे दुसरे पुतणे, युनायटेड वेस्टर्न बँकेचे चेअरमन सतीश काशिनाथ, रुपी को. ऑप. बँकेचे गिरीश मराठे, अजित मराठे तसेच त्यांच्या सख्ख्या चुलत सुना, नातवंडे, भाऊ, भावजया असे कुटुंबीय हजर होते. सर्वांनी त्यांचे अभिष्ट चिंतन करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

मराठे परिवारातर्फे सुधाकर बळवंत यांना ''जीवेत् शरदः शतम्'' अशा शुभेच्छा.

**भारती सतीश M.A., पुत्र पुष्कर SSC**

वरील समारंभातच **सतीश काशिनाथ यांच्या सौभाग्यवती भारती** (पृ.१२९) यांनी अनेक वर्षे शिक्षणामध्ये खंड पडूनहि जून २००४ मध्ये M.A. ही पदवी मिळविल्याबद्दल त्यांचे सर्वांनी कौतुक केले. तसेच **त्यांचे पुत्र पुष्कर यांचेहि मार्च २००४ मध्ये SSC परीक्षा उत्तीर्ण** झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

**'किरात'ला विशेष साहित्यसेवा पुरस्कार**

इंडियन आर्ट, कल्चर अँड टॅलेंट डेव्हलपमेंट सेंटर या ठाणे जिल्ह्यात शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेने आयोजित केलेल्या **दिवाळी अंक राज्यस्तरीय स्पर्धेत** वेंगुर्ल्याहून गेली ८२ वर्षे प्रसिद्ध होणाऱ्या **साप्ताहिक किरातच्या २००४ दिवाळी अंकाला विशेष साहित्यसेवा पुरस्कार** देण्यात आला. संपादक श्रीधर केशव (पृ.३९६) यांचे मराठे परिवारातर्फे खास अभिनंदन.

**६०० दिवस कोमात**

अक्षरधामवर २४ सप्टेंबर २००२ रोजी झालेल्या हल्ल्यात गोळी लागलेला NSG कमांडो सुरजन सिंह हा तब्बल ६०० दिवस कोमात होता. अखेर १९ मे २००४ रोजी म्हणजे तब्बल ६०० दिवसानंतर त्याला मृत घोषित करण्यात आले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या शहीद सैनिकाच्या बलिदानाची प्रसारमाध्यमांनी मात्र फारशी दखल घेतली नाही. (**रमाकांत माधव विद्वांस, पृ.६२३,** यांचेकडून प्राप्त)

**काव्यसुधा श्रीमती सुधा यशवंत**

प्रतिष्ठानचे अध्यक्ष **आनंद यशवंत (पृ.२७७) यांच्या मातोश्री श्रीमती सुधा यशवंत** १९७२ साली दीर्घ आजाराने हॉस्पिटलमध्ये असताना त्यांना वाटायचे की या जगात रामाशिवाय आपले कोणी नाही. या भावनेतून त्यांना पुढील प्रासयुक्त काव्यपंक्ती सुचल्या.

तुजवाचुनी कुणी मज नाही, नाही कुणी देवा,
सारखा तुझा ध्यासहि घ्यावा

तेव्हापासून कौटुंबिक सण-समारंभात आपले विचार काव्यांतून व्यक्त करण्याचा त्यांना छंदच लागला. त्यांच्या कवितांचा संग्रह 'काव्यसुधा' त्यांच्या सुनेने नुकताच प्रसिद्ध केला आहे.

**नांदा सौख्य भरे**

१) थाटीपूर, ग्वाल्हेर (म. प्र.) येथील सभासद **सुशील केशव (पृ.२४०) यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीराम** याचा शुभविवाह अलाहाबाद येथील अनिल दामले यांची मुलगी संपदा हिच्याशी ग्वाल्हेर येथे ६.१२.०४ रोजी संपन्न झाला.

२) तसेच त्यांचे **द्वितीय चिरंजीव सौमित्र** याचा विवाह ठाणे येथील अविनाश चांदेकर यांची मुलगी अनुश्री हिच्याशी ९.१२.०४ रोजी इंदौर येथे संपन्न झाला.

३) खोतोडे गोवा येथील सभासद **(कै.) लक्ष्मण पांडुरंग (पृ५४३) यांचा मुलगा अजित** याचा शुभविवाह शामराव जोशी यांची कन्या चित्रा हिच्याशी ८.१२.०४ रोजी रामनाथी, फोंडा, गोवा येथे संपन्न झाला.

४) पुण्यांतील सभासद **सुरेश भालचंद्र (पृ.२७९) यांचा मुलगा राहुल** याचा शुभविवाह रामभाऊ भिडे यांची कन्या श्रद्धा हिच्याशी २५.१२.०४ रोजी पुण्यांत थाटामाटाने साजरा झाला.

५) ढवळी, फोंडा, **गोवा येथील प्रतिष्ठानचे क्रियाशील सभासद कालिदास बाळकृष्ण (पृ.५४१) यांची द्वितीय कन्या अर्चना** हिचा शुभविवाह नारायण वामन अभ्यंकर, पिंपरी, पुणे यांचा मुलगा रामचंद्र ऊर्फ संतोष याच्याशी १३.२.०५ रोजी चिंचवड येथे संपन्न झाला.

**सर्व वधूवरांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन**

**सहवेदना**

पुण्यातील म. प्र. चे सभासद **अभय कमलाकर जाईल यांचे काका काशिनाथ अनंत** (पृ.७५७) यांचे २४.११.२००४ रोजी निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मराठे परिवार सहभागी आहे.

* * *


**आजोबा हरि प्रभाकर मराठे**
(१८८९ ते १९६३)
**यांच्या स्मरणार्थ**



**प्रभाकर दामोदर मराठे,**
वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

# कै. सुरेशभाऊ मराठे स्मृति सांस्कृतिक कार्यक्रम (२७.२.०५)

**- लक्ष्मण शंकर** (पृ.५२०), मुलुंड, मुंबई

कै. सुरेशभाऊंना कला, क्रीडा आणि उद्योग क्षेत्रांबाबत विलक्षण आस्था होती. दर वर्षी एक तरी सांस्कृतिक कार्यक्रम आणि उद्योग प्रेरणा याबाबत एखादा कार्यक्रम वा उपक्रम या गोष्टी पार पाडण्याबाबत त्यांचा आग्रह होता. या गोष्टीमुळेच प्रतिष्ठानची प्रतिष्ठा टिकून राहील व इतर उपक्रमाबाबत कुलबांधवांचा सहभाग वाढेल असा त्यांचा विश्वास होता.

या दृष्टिकोनातून यंदा कै. सुरेशभाऊंच्या ५व्या स्मृतिदिनानिमित्त एक सांस्कृतिक कार्यक्रम ठाणे येथे २७ फेब्रुवारी २००५ रोजी सायंकाळी ४ ते ८ पर्यंत मोठ्या दिमाखांत साजरा झाला. सुमारे शंभर कुलबांधव मुंबई व उपनगरे, ठाणे परिसर, नवी मुंबई, पनवेल इ. भागांतून या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिले होते.

सुरवातीला प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष आनंद राव मराठे, कार्योपाध्यक्ष रमाकांत विद्वांस आणि सुरेशभाऊंचे चिरंजीव यशवंतराव यांनी कै. सुरेशभाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर कार्यक्रमाला सुरवात झाली.

या कार्यक्रमात बाजी मारली ती बालकलाकारांनी सादर केलेल्या नृत्यांनी. अंबरनाथ येथील सभासद **मनोहर दामोदर (पृ.२७५) यांचा नातू पार्थ पराग** या ज्युनियर केजीतील चिमुरड्याने अतिशय धीटपणाने सादर केलेल्या 'ओंकार स्वरूपा' या गाण्यावरील नृत्यवंदनेने कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यानंतर नालासोपारा येथील प्रतिष्ठानचे सहकार्यवाह **हेमंत अरुण (पृ.२१) यांची मुलगी प्राची** हिने ठसक्यांत सादर केलेली लावणी, **तिची चुलत बहीण शर्वरी शरद** हिने सादर केलेले 'वादळवारं सुटलं रं' हे कोळी नृत्य आणि दोघींनी सादर केलेले 'अपलम् चपलम' या गाण्यावरील युगलनृत्य यांनी सर्वांची वाहवा मिळवली. तसेच मुलुंड मधील कुलबांधव **महेश अनंत (पृ.५४८) यांची मुलगी राधिका** हिने 'पुलं'चा सुप्रसिद्ध 'नारायण' एकपात्री कथनांतून लोकांपुढ समर्थपणे उभा केला.

प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष **रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३) यांच्या बहिणीची मुलगी सौ. कृपा (ठाकूर) पाटील आणि तिचे पति निशांत** हे दोघे जाहिरात व्यावसायिक-क्रीएटिव्ह आर्टिस्ट. त्या दोघांनी संगीतावर आधारित दूरदर्शन कार्यक्रमांत बक्षिसे मिळवली आहेत. झी अंताक्षरीच्या कार्यक्रमांत तर ते वर्ल्ड इंटरनॅशनल फायनलपर्यंत पोचले होते. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'मुखवटे' या चित्रपटांत निशांतने प्लेबॅक दिला आहे. तर कृपाने इटीव्ही मराठीच्या 'सांगा सांगा लवकर सांगा' या कार्यक्रमाच्या २५हून जास्त भागांचे सादरीकरण केले आहे.

आजच्या कार्यक्रमांत निशांतने 'सखी मंद झाल्या तारका', कृपाने 'पिया तोसे नैना लागे रे' आणि दोघां पतिपत्नींनी मिळून 'ओंकार स्वरूपा', 'मेघा रे मेघा रे' आणि मुखवटे मधील 'तुला पाहुनी' अशी तीन युगलगीते सादर करून जमलेल्या रसिकांची मने जिंकून घेतली.

यानंतर पुढे आली एक 'छुपा-रुस्तुम' कलाकार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष **आनंद यशवंत यांची वहिनी वंदना विश्वास (पृ.२७७).** घराणेदार गायकीपासून रीमिक्सपर्यंतचे सांगीतिक किस्से सादर करणारा त्यांचा एकपात्री कार्यक्रम प्रेक्षकांच्या पसंतीचे हशे व टाळ्या मिळवून गेला.

यानंतर सध्या अनेक जाहीर कार्यक्रमांतून सर्वांना परिचित झालेली गायिका **संध्या खांबेटे** (पृ.६९६) हिने 'जयशारदे वागेश्वरी', 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या', 'जाईन विचारित प्राण फुलाऽऽ' इ. लोकप्रिय भावगीते अतिशय समर्थपणे सादर केली. तसेच 'निळ्या रंगाची निळी नवलाई, घाली भुरळ मनाला भारी' हे स्वत: संगीत दिलेले आपले गीत सादर करून गीतकार व संगीतकार अशी स्वत:ची नवी ओळख निर्माण केली. त्यानंतर कळसाध्याय म्हणजे **गणेश जाईल** (पृ.७५५) यांनी सादर केलेली नाट्यगीते. अमृतसिद्धी नाटकातील मा. दीनानाथ यांच्या 'ही समज तव कुटिल चतुराई' या भैरवीतील कै. सुरेशभाऊंच्या आवडत्या नाट्यगीताने त्यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

या सर्व कार्यक्रमांची रंगत वाढवली ती सर्वांना परिचित दूरदर्शनवरील वृत्तनिवेदिका **मंजिरी मराठे** (पृ.३९२) यांच्या निवेदनाने. कार्यक्रम सुरू झाल्यानंतर मंजिरीचे आगमन झाले आणि तिला काहीहि पूर्वकल्पना नसताना निवेदनाची जबाबदारी तिच्यावर सोपवत असल्याची जाहीर घोषणा करण्यात आली. तिनेही मोठ्या आनंदाने ही कामगिरी स्वीकारली आणि निरनिराळ्या गाण्यांचे कवि, संगीतकार इ. बाबतचे किस्से/प्रसंग तसेच गाण्याच्या विषयाशी संबंधित काही कविता इ. उत्स्फूर्तपणे सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. ती केवळ लिहून दिलेले कागद वाचणारी निवेदिका नसून स्वतंत्रपणे सादरीकरण करणारी क्रिएटिव्ह आर्टिस्ट असल्याचा सुखद अनुभव सर्व उपस्थितांना आला.

बालकलाकारांचे खाऊ देऊन कौतुक करण्यात आले; तसेच अन्य कलाकारांना कार्याध्यक्षांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

शेवटी मटार करंजी, साबुदाणा वडा, चटपटीत शेवपुरी, मुगाचा शिरा अशा अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली. ***

## *विवाह सहाय्य*

**वर** - अमित कमलाकर मराठे, को.ब्रा., गोत्र - कपि, जन्म - ८.६.१९७४, उंची - ५'-४'', निमगोरा, स्मार्ट, तरतरीत बांधा, सुदृढ, व्यंग नाही, रक्तगट ORh-ve, मंगळ सौम्य (निर्दोष), बी. ई. (पॉलीमर) + सॉफ्टवेअर इंजिनियर + जापनीज (सॉफ्टवेअरमध्ये), M.B.T. पुणे येथे नोकरी, मा. प्रा. रु. २००००, वडील ॲडव्होकेट, आई गृहिणी, भाऊ विद्यार्थी, देवगड येथे स्वत:चे घर, प्रॉपर्टी. **अपेक्षा** : अनुरूप, नोकरीची अट नाही, सायन्स ग्रॅज्युएट असावी. **संपर्क** : ॲडव्होकेट कमलाकर जयराम मराठे, मु. पो. ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग, फोन : ०२३६४-२६२२६२

# गोमंतक मराठे परिवार संमेलन (१६ जानेवारी २००५)

**- प्रदीप अनंत** (पृ.५३८), वेळगे-पाळी, गोवा

तिसरे गोमंतक मराठे परिवार संमेलन दि. १६.१.२००५ रोजी सकाळी ९.०० ते संध्याकाळी ४.३० वाजेपर्यंत श्री. **पुरुषोत्तम विष्णु मराठे, बिंबल, सत्तरी, गोवा यांच्या निवासस्थानी** हिरव्यागार वनराईमध्ये थाटात पार पडले.

सकाळी ८.३० वाजताच ठिकठिकाणाहून आपल्या कुटुंबीयांसह संमेलनस्थळी येऊ लागले. सकाळच्या थंड वातावरणात सभासद नोंदणी, चहा व अल्पोपहाराचा कार्यक्रम पार पडला. नंतर सकाळी १०.१५ वाजता संमेलनाचे उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू झाला. ईशस्तवन कु. प्रणव प्रदीप याने केले. त्यानंतर एक कुलबांधव कै. रामनाथ मराठे, धारबांदोडा यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाला सुरवात झाली.

आपल्या स्वागतपर **प्रास्ताविक भाषणात पुरुषोत्तम विष्णु (पृ.५२१)** यांनी. संमेलन आयोजण्यामागचा हेतु विशद केला. **संमेलनाध्यक्षा सौ. अपूर्वा अरुण (पृ.५३) व प्रमुख पाहुणे श्री. श्रीरंग बर्वे**-सातोडे, गोवा (बर्वे कुलबंधु स्नेहसंवर्धक मंडळ-गोवा) यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून संमेलनाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर श्री. नीळकंठ विष्णु (परशुराम) (पृ.५२१), डिचोली हे पण हजर होते.

संमेलनाचे **प्रमुख पाहुणे श्री. श्रीरंग बवे** यांनी बर्वे कुलबंधु स्नेहसंवर्धक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या संमेलनतील काही महत्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख करून अशी संमेलने होण्याची गरज प्रतिपादन केली. बर्वे कुलबंधु मंडळातर्फे आर्थिक दृष्ट्या मागास कुटुंबाना मदत, मुलांसाठी, युवकांसाठी विविध स्पर्धा घेतल्या जातात तसेच विचारांची देवाणघेवाण होते. अशा संमेलनातून परिवारात एकोपा साधला जाऊन एकमेकांना मदत होते. त्यामुळे अशी संमेलने व्हायला हवीतच असा अभिप्राय मांडला.

आपल्या **अध्यक्षीय भाषणात सौ. अपूर्वा अरुण** यांनी अशी संमेलने व्हायलाच हवी असा विचार मांडून परिवारात एकता साधून ''वसुधैव कुटुम्बकम्'' म्हणजे सारे विश्वच माझे कुटुंब असा विचार प्रत्येक मनुष्य प्राण्याच्या मनावर बिंबवायला हवा अशा प्रकारचे विचार मांडले.

त्यानंतर ''अशा परिवार संमेलनाची गरज'' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम पार पडला. जवळजवळ सर्वच वक्त्यांनी अशा संमेलनाची गरज असल्याचे सांगून येणाऱ्या प्रत्येक संमेलनात सभासदांची उपस्थिती कशी वाढेल यावर विचार करण्याचे आवाहन केले. आपापल्या परीने संमेलनात कोणत्या विषयावर कार्यक्रम व्हावे यावर काहींनी आपले विचार असे मांडले

१. पुरुषोत्तम विष्णु - कुलबंधुंचा परिचय व्हावा, प्रत्येकाच्या परिचयाचा फायदा स्वत:सह इतरांनाही व्हावा व संमेलनात होणाऱ्या विविध विषयांवर चिंतन व्हावे.

२. सौ. शुभदा दीपक (पृ.५३३) - युवकांसाठी वेगळे कार्यक्रम व्हावे व युवकांचा तसेच परिवारातील सभासदांचा सहभाग वाढावा.

३. पूजा नीळकंठ (पृ.५२१) - सांस्कृतिक कार्यक्रम तसेच Carrier Guidance वर कार्यक्रम व्हावे.

४. विष्णु पांडुरंग (पृ.५२२) - संमेलनात एक सत्र चित्पावनी भाषेत असावे, कुलबांधवांची माहिती असणारी पुस्तिका तयार करावी.

५. विश्वनाथ सीताराम (पृ.५२०) - सर्व कुलबांधवांची एकमेकांना माहिती असावी.

६. सुदिन सदाशिव (पृ.५२१) - कुलबांधवांचे परस्पर सहकार्य असावे.

७. अजित लक्ष्मण (पृ.५४३) - इतर परिवारातील सभासदांना बोलवावे, ब्राह्मण परिवार असल्याने वेदविद्या, भिक्षुकी तसेच नित्यक्रमाबद्दल माहिती, मार्गदर्शन करावे.

८. प्रदीप अनंत (पृ.५३८) - परिवारातील एकात्मतेपासून सुरवात करून स्वत:सह प्रदेशाच्या विकासास हातभार लावावा.

दुपारी १.३० वा. स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. सर्वांनी खतखत्याचा आस्वाद घेत भोजन घेतले त्यानंतर दुपारी ३.०० वा. दुसऱ्या सत्राला सुरवात झाली. मुख्य विषय होता ''आगामी ३० एप्रिल ते १ मे रोजी गोव्यात होणारे अखिल भारतीय मराठे परिवार संमेलन यशस्वी करणे''. आगामी संमेलनाच्या कार्यक्रमाबाबत बराच ऊहापोह होऊन संमेलन दोन पूर्ण दिवस घेण्याबाबत एकवाक्यता झाली. त्यानंतर संमेलनासाठी आयोजन समिती, स्मरणिका समिती, सांस्कृतिक कार्यक्रम समिती, भोजन समिती, निवास समिती, वैद्यकीय सहाय्य समिती, वाहतुक समिती, छायाचित्रण व प्रसिद्धी समिती, स्वागत समिती, निधी समिती, सजावट समिती अशा विविध समित्या नियुक्त करण्यात आल्या.

समित्या निवडीनंतर संमेलनासाठी येणाऱ्या खर्चाचा आढावा घेण्यात आला यात विविध मान्यवर कुलबंधुनी भाग घेऊन आगामी संमेलनासाठी जवळजवळ रु. १,२५,००० अंदाजपत्रक करण्यात आले. संमेलनासाठी देणगीची सुरवात म्हणून काही कुलबंधूंनी खालील देणग्या जाहीर केल्या.

१. सदाशिव नारायण - रु. १०००
२. अजित लक्ष्मण - रु. १०००
३. विष्णु पांडुरंग - रु. १०००
४. गणेश शंकर - रु. १०००
५. दीपक बाळकृष्ण - रु. १०००
६. दीपक विश्वनाथ - रु. ५००

नोंदणी शुल्क म्हणून रु. २०० आकारण्याचे ठरविण्यात आले. निवडण्यात आलेल्या सर्व समिती सदस्यांची एक बैठक दि. ३० जानेवारी २००५ रोजी श्री. अरुण शिवराम यांच्या निवासस्थानी घेण्याचे ठरविण्यात आले.

थोडक्यात सर्व गोमंतकीय सभासदांनी एकत्र येऊन आगामी संमेलन सुंदर व संस्मरणीय करण्याचा संकल्प व्यक्त केला. शेवटी समारोप करताना यजमान श्री. पुरुषोत्तम विष्णु यांनी आगामी संमेलन सर्वार्थाने यशस्वी करण्याचे आवाहन केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन श्री. प्रदीप अनंत यांनी केले. संध्याकाळी ठीक ४.३० वा. चहापानाने संमेलनाचा समारोप झाला.

***

**हितगुज वर्गणीदारांचे पत्ते** आपापल्या गावांतील कुलबांधवांशी संपर्क साधता यावा या हेतूने मागील अंकात महाराष्ट्राबाहेरील हितगुज वर्गणीदारांचे पत्ते दिले होते. या अंकात रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, अहमदनगर या जिल्ह्यातील पत्ते दिले आहेत.

## रायगड जिल्हा

७८२/३४०जे/के-०४३
विश्वनाथ गोपाळ मराठे
गावल अली, मु. पो. गोरेगांव,
गोरेगांव, **जि. रायगड ४०२ १०३.**

२६९६/२४२/२४८एफ/के-०३२
सुनिल यशवंत मराठे
१०६१, माणगांव-निजामपूर रोड,
माणगांव, **जि. रायगड ४०२ १०४.**

१२१३/६०२/८६६बी/के-१०४
संजय केशव खांबेटे
नरेंद्र स्टोअर्स, मु. पो. म्हासळा,
ता. म्हसाळा, **जि. रायगड ४०२ २०५.**

२१५१/७०३/३४२ए/के-०४३
प्रफुल्ल प्रभाकर मराठे
७, बँक ऑफ इंडिया अधिकारी निवास,
अलिबाग, **जि. रायगड ४०२ २०१.**

३००८/७०२/१३२ई/के-०१९
अनिल वसंत मराठे
भवानी शंकर रोड, नाईक अली, मु. पो. वरसोली,
ता. अलिबाग, **जि. रायगड ४०२ २०१.**

६९५/२४८बीडी/के-०३२
सौ. शुभद्रा दिलीप जोशी
द्वारा डी. डी. जोशी, एम. एस. ई. बोर्ड, मु. पो. गोरेगांव, ता. माणगांव, **जि. रायगड ४०२ १०३.**

२१४५/२४५/३४१यू/के-०४३
प्रभाकर काशिनाथ मराठे
मु. पो. गोरेगांव, ता. माणगांव,
**जि. रायगड ४०२ १०३.**

२९१०/५७५/६५८ई/के-०९९
दिलीप विष्णु विद्वांस
तडफाळे हाऊसजवळ, इरीगेशन कोल रोड, मु. पो. माणगांव, ता. माणगांव, **जि. रायगड ४०२ १०४.**

३००९/७०४/७२९ए/के-१०९
गंगाधर रामचंद्र चक्रदेव
रामेश्वर मंदिर, हनुमान अली,
मु. पो. पेण, **जि. रायगड ४०२ १०७.**

३००७/७०१/१३२बी/के-०१९
विनायक वसंत मराठे
भवानी शंकर रोड, नाईक आळी, मु. पो. वरसोली,
ता. अलिबाग, **जि. रायगड ४०२ २०१.**

३२२५/९०७/१६९/के-०२५
गजानन नारायण मराठे
सरस्वती भुवन, मंगलवाडी,
रोहा, **जि. रायगड ४०२ १०९.**

२८६३/५३४/६३३एफ२/के-०९७
प्रमोद रामचंद्र विद्वांस
गिरीजा निवास, मु. गुलसुंदे, ता. पनवेल,
गुळसुंदे, **जि. रायगड ४१० २०७.**

२८४३/५००/६७६पी/के-१०१
अरविंद गोपाळ खांबेटे
पुष्कर बंगला, १०, वैभव, मु. रीस,
चांभ्रली-मोहोपाडा, **जि. रायगड ४१० २०७.**

२९११/५७६/६५९बी/के-०९९
बल्लाळ रामचंद्र विद्वांस
राणे चाळ, मु. पो. कोलाड-वरसगांव,
ता. रोहा, **जि. रायगड ४०२ ३०४.**

२९२०/५९२/६३३एच/के-०९७
मधुकर सदाशिव विद्वांस
मु. पो. गुळसुंदे, ता. पनवेल,
**जि. रायगड ४१० २०७.**

२५१२/४७०/०२७जी/के-००१
जयंत रामचंद्र मराठे
नील प्राईड, सुप्रिम सोसायटी, प्लॉट २४, सेक्टर २,
नवीन पनवेल, **जि. रायगड ४१० २०६.**

नवीन
उपेंद्र दिगंबर मराठे
अे ३/४ किनारा को. हौ. सोसायटी, ५२ बंगला,
पनवेल, **जि. रायगड ४१० २०६.**

७४६१६६२/२२७७/२०६/७५४डी/के-११३
श्रीकृष्ण विष्णु जाईल
जनार्दन छाया, मु. पो. पनवेल,
ता. पनवेल, **जि. रायगड ४१० २०६.**

७४५७८५५/२९७२/५९६/३६७के/के-०४६
महेश श्रीकृष्ण मराठे
ई-४९, यशोमंगल, टिळक रोड,
ता. पनवेल, **जि. रायगड ४१० २०६.**

२८८२/५४८/१६३ई/के-०२५
शैलेश श्रीनिवास मराठे
प्लॉट ५/४१/१०, सिडको कॉलनी,
ता. पनवेल, **जि. रायगड ४१० २०७.**

२८६८/५४०/३४१जी/के-०४३
सुहास सुधाकर मराठे
बी/१२, यशोमंगल अपार्टमेंटस्,
ता. पनवेल, **जि. रायगड ४१० २०६.**

२८८३/५४६/७५५एच/के-११३
प्रभाकर जनार्दन जाईल
जुना जाईल वाडा, जुई, टिळक रोड,
पनवेल, **जि. रायगड ४१० २०६.**

२४१२/२००/१६३बी/के-०२५
वसंत भालचंद्र मराठे
सी-६, बि. नं. २०, आय/२, सेक्टर १८, सिडको कॉलनी, नवीन पनवेल, **जि. रायगड ४१० २१७.**

२९०७/५७१/१६८एच/के-०२५
रमेश शंकर मराठे
प्रतिमा नॉव्हेल्टीज, गणपती मंदिराजवळ,
देऊळवाडा, पाली, **जि. रायगड ४१० २०५.**

२९०९/५७४/१६८एल/के-०२५
वासुदेव शंकर मराठे
गणपती मंदिराजवळ, देऊळवाडा,
पाली, **जि. रायगड ४१० २०५.**

२९०८/५७३/१६९एन/के-०२५
मधुकर रामचंद्र मराठे
पुरुषोत्तमप्रसाद, गणपती मंदिराजवळ, देऊळवाडा,
पाली, ता. सुधागड, **जि. रायगड ४१० २०५.**

२११८/५७२/३४१एन/के-०४३
बाळकृष्ण केशव मराठे
मराठे वाडा, रामाची आळी, ता. सुधागड,
पाली, **जि. रायगड ४१० २०५.**

२५३८/६२३/१७०एफ/के-०२५
रत्नाकर सुंदर मराठे
गणपती मंदिराजवळ, देऊळवाडा, पाली,
ता. सुधागड, **जि. रायगड ४१० २०५.**

२२१३/२९०/६५८एफ/के-०९९
सदानंद प्रभाकर विद्वांस
घर क्र. ७४, कचेरी टेकडी जवळ, मु. मुद्रे बुद्रुक,
पो. कर्जत, **जि. रायगड ४१० २०१.**

३०९७/७९१/३५९एम/के-०४६
उदय हरी मराठे
५ परीमल सोसायटी, १ला मजला, डॉ. वैद्य घरासमोर,
विठ्ठल नगर, कर्जत, **जि. रायगड ४१० २०१.**

३०९५/७९०/२३८एफ/के-०३२
जयंत माधव मराठे
नंदादीप, विठ्ठलनगर, मु. पो. कर्जत,
ता. कर्जत, **जि. रायगड ४१० २०१.**

३०९६/७९२/३५८ए/के-०४६
विनायक नारायण मराठे
मराठेंचे घर, महावीर पेठ, लायब्ररी जवळ,
कर्जत, **जि. रायगड ४१० २०१.**

२४९३/१८१/२२०एन/के-०३२
रविंद्र गोविंद मराठे
आशीर्वाद, कोतवालनगर शाळेच्या समोर,
कर्जत, **जि. रायगड ४१० २०१.**

३०८९/७८६/७३५के/के-१०९
विनीत माधव चक्रदेव
मु. वैजनाथ, पो. हुमगाव, ता. कर्जत,
वैजनाथ, **जि. रायगड ४१० २०१.**

२९३१/६६५/०५८एल/के-००४
सुधाकर विष्णू मराठे
मराठेंचे घर, खालची आळी, मु. पो. नागांव,
ता. अलिबाग, नागांव, **जि. रायगड ४०२ २०४.**

२३८६/१९१/६६४एफ/के-१००
सुरेश नारायण विद्वांस
अॅड. बोरवणकरांचे घर, मु. पो. चौल,
ता. अलिबाग, **जि. रायगड ४०२ २०३.**

## रत्नागिरी जिल्हा

२६३८/१३७/०४६एच/के-००२
आनंद महादेव मराठे
गुरुकृपा मंगल कार्यालय, १०८४, पऱ्याची आळी,
**रत्नागिरी ४१५ ६१२.**

२९०३/५५५/३२४पीडी/के-०४१
सौ. रोहिणी गणेश वैद्य
द्वारा जी. व्ही. वैद्य, सरस्वती अपार्टमेंटस्,
जोशी पाणंद, **रत्नागिरी ४१५ ६१२.**

२६४२/१४१/०९२बी/के-००९
अनंत दत्तात्रय मराठे
१२, इंदिरा गोविंद अपार्टमेंट, १ला मजला,
दत्त मंगल कार्यालयासमोर, **रत्नागिरी ४१५ ६१२.**

६१७/३९७जेडी१/के-०४८
सौ. प्रतिभा पांडुरंग पेठे
३०२६, सर्वोदय छात्रालय बिल्डींग,
टिळक आळी, **रत्नागिरी ४१५ ६१२.**

२६४०/१३९/०४६जे/के-००२
भास्कर नरहर मराठे
गंगा, डॉ. दाते कॉलनी,
नाचणे रोड, **रत्नागिरी ४१५ ६३९.**

२१४३/१४३/३२३सी/के-०४१
सुरेश पांडुरंग मराठे
एम-६११, नरहर वसाहत, एम.आय.डी.सी.
शिवाजी नगर, **रत्नागिरी ४१५ ६३९.**

३२७१/९४५/३७४/के-०४६
विनायक दत्तात्रय मराठे
मु. उसगांव, पो. दापोली, ता. दापोली,
**जि. रत्नागिरी ४१५ ७१२.**

९९१८/८६४/के-०९७
वामन विश्वनाथ विद्वांस
जगजीवन हॉटेल, मु. केळशी, ता. दापोली,
केळशी, **जि. रत्नागिरी.**

२६४८/१८३/१५०एम/के-०२३
दीपक मुकुंद मराठे
मधली वठार, मु. पो. कोळंबे
**जि. रत्नागिरी ४१५ ६१२.**

२९०१/५५३/३२४पीडी/के-०४१
सौ. निर्मला केशव गानू
द्वारा के. व्ही. गानू, मधली आळी, न्यू इंग्लिश
शाळेसमोर, देवरुख, **जि. रत्नागिरी ४१५ ८०४.**

९८५
सतीश मधुकर मराठे
श्रीक्षेत्र डेरवण, B.K.L.W हॉस्पिटल, मु. डेरवण,
पो. सावर्डे, ता. चिपळूण, **जि. रत्नागिरी ४१५ ६०६.**

२६४१/१४०/१२१एच/के-०१५
उदय (मोरेश) शंकर मराठे
१६०६, फाटक वाडा, बंदर रोड,
काँग्रेस भुवन जवळ, **रत्नागिरी ४१५ ६१२.**

२२१६/१४२/०४५ई/के-००२
भगवान प्रभाकर मराठे
म्युनिसिपल हाऊस नं. ३७२१, पेठ किल्ला,
**रत्नागिरी ४१५ ६१२.**

२९०४/५५६/३२४पीडी/के-०४१
सौ. शोभा सुहास सोहोनी
द्वारा एस. पी. सोहोनी, २७६२, लिमये वाडा,
वरची आळी, सुभाष रोड, **रत्नागिरी ४१५ ६१२.**

२६३९/१३८/०४७बी१/के-००२
दत्तात्रय धुंडीराज मराठे
औदुंबर, स्टेट बँक कॉलनी, शिवाजी नगर,
**रत्नागिरी ४१५ ६३९.**

२४०४३/२९२५/५९८/०४६एफ/के-००२
मुकुंद श्रीपाद मराठे
जी-७१०, नरहर वसाहत, शिवाजी नगर,
**रत्नागिरी ४१५ ६३९.**

२९०२/५५४/३२४पीडी/के-०४१
सौ. रेखा राजाराम चितळे
ए/२, पुष्पेंद्र कॉम्प्लेक्स, शेरेनाका, झाडगांव,
वीर सावरकर रोड, **रत्नागिरी ४१५ ६१२.**

९९५५/९९९ई/के-९९९
सुरेश वासुदेव बापट
मु. पो. कळंबस्ते, ता. संगमेश्वर,
**जि. रत्नागिरी.**

नवीन
श्री. सुधाकर नरहर मराठे
६६८, वनश्री, बाणेवाडी रस्ता, मु. पो. पोमेडी (बु.)
**ता. जि. रत्नागिरी ४१२ ६१५.**

६१२/३९७जेडी१/के-०४८
सौ. मुग्धा दिलीप पटवर्धन
मु. पो. गोलप, ता. रत्नागिरी,
**रत्नागिरी ४१५ ६१६.**

२४५०/३१५/३६५जे/के-०४६
रमेश भिकाजी मराठे
मु. पो. मुरतवडे, ता. चिपळूण,
**रत्नागिरी ४१५ ६४१.**

## सिंधुदुर्ग जिल्हा

२९४१/६२८/५३४एल/के-०७१
लक्ष्मण पांडुरंग मराठे
मु. पो. ढाकोरे, व्हाया शिरोडा,
ता. सावंतवाडी, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१०.**

३०४१/७६२/५०३सी/के-०६८
बाळकृष्ण गणेश मराठे
मु. पो. तुळस, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१५.**

३०८१/७७६/५०६ए/के-०६८
केशव नारायण मराठे
मु. पो. तुळस, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१५.**

२२७४/४८३/४०५ए/के-०४९
चिंतामण रामचंद्र मराठे
मु. पो. आडेली, ता. वेंगुर्ले,
आडेली, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

३०८२/७७७/५३३बी/के-०७१
प्रसाद शिवराम मराठे
मु. पो. होडावडे, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

२०६८/२०३/५११जी/के-०६९
माधव यशवंत मराठे
मु. पो. मठ, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५३९.**

२९४०/६२६/४०५के/के-०४९
बाळकृष्ण नारायण मराठे
सी/२४८, भटवाडी, मु. पो. सावंतवाडी,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१०.**

२६१४/६९/५०३एच/के-०६८
दत्तात्रय श्रीराम मराठे
मु. पो. तुळस, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१५.**

३०८०/७७५/४९६बी/के-०६७
श्रीनिवास गजानन मराठे
मु. पो. तुळस, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१५.**

३१८७/८७२/५०५एडब्ल्यू/के-०६८
सौ. लक्ष्मी बाळकृष्ण मराठे
मु. पो. तुलास, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१५.**

३०७९/७७४/४९५ई/के-०६७
लक्ष्मण महादेव मराठे
मु. पो. होदावडे, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

३१९३/८७७/के-०००
दत्तगुरु रामचंद्र मराठे
मु. पो. रेडी, कंसाल, ता. वेंगुर्ले,
रेडी, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१७.**

९८९
मंदार शरदचंद्र मराठे
मु. पो. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

३०७६/७७१/४०४एफ/के-०४९
प्रभाकर दिनकर मराठे
रसकुमारी औषधालय, भटवाडी, मु. पो. वेंगुर्ले,
ता. वेंगुर्ला, **जि. सिंधुदुर्ग - ४१६ ५१६.**

६२७/४०५केडी/के-०४९
सौ. सुमन श्रीकांत रानडे
मारुती मंदिराजवळ, राम मारुती रोड, वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

३०७८/७७३/४९४ए/के-०६७
गजानन कृष्णाजी मराठे
द्वारा एडिटर, किरात, भटवाडी, ता.वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

९९१९/४०६ई/के-०४९
रविंद्रनाथ यशवंत मराठे
घर क्र. ४१, वॉर्ड नं. १४, मु. पो. भटवाडी,
ता. वेंगुर्ले, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

२०६७/२५६/३९६ए/के-०४८
श्रीधर केशव मराठे
एडिटर, किरात, भटवाडी, ता.वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

२९३२/६०६/३९७के/के-०४८
श्रीकृष्ण जयंत मराठे
मु. भटवाडी, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

३०७७/७७२/४०७डी/के-०४९
मदन (मधू) रामचंद्र मराठे
मु. पो. वेंगुर्ला, भटवाडी, ता. वेंगुर्ले,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१६.**

२१४४/१९४/०४९सी/के-००२
जयराम यशवंत मराठे, वकील
मु. पो. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१३.**

३०७३/७६७/०४१ए/के-००२
दत्तात्रय भिकाजी मराठे
मु. कलवी, पो. तेंबावली, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१९.**

२४७४/७०६/११९सी/के-०१५
पुरुषोत्तम श्रीराम मराठे
रिटायर्ड टिचर, मु. पो. दहीगाव,
ता. देवगड, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ६३०.**

२१२९/१६७/०४२सी/के-००२
विश्वास सिताराम मराठे
स्वाश्रय, वरचा कुंभारवाडा, ओमकार मंगल
कार्यालयाजवळ, कुडाळ, **जि. सिंधुदुर्ग.**

३१६९/८५०/४३७एल/के-०५७
डॉ. अरविंद दिवाकर मराठे
मु. हरकुल, पो. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

२९७०/६४३/४३८आर/के-०५७
माधव नारायण मराठे
श्री धोलाम गुरुजी हाऊस, विद्यानगर,
मु. पो. कणकवली, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

३१७१/८५२/४३९के/के-०५७
विश्वनाथ गणेश मराठे
मु. पो. हरकुल बुद्रुक, ता. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६२४.**

३२९४/९५३/४३९डी/के-०५७
पांडुरंग एल. मराठे
लक्ष्मी मंगल कार्यालय, विद्यामंदिर जवळ,
मु. पो. कणकवली, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

२४७५/९६९/११७बी/के-०१५
वसंत रावजी मराठे
मु. खुडीपाट, पो. खुडी, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६३०.**

३०७४/७६९/०४८ए/के-००२
अशोक वासुदेव मराठे
मु. कलवी, पो. टेंबवली,
ता. देवगड, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१३.**

२२६१/७६८/०४१डी/के-००२
श्रीधर कृष्णाजी मराठे
मु. कलवी, पो. टेंबवली, ता. देवगड,
कलवी, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१९.**

२१२९/१६७/०४२सी/के-००२
विष्णु सखाराम मराठे
मु. पो. मुटाट, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०३.**

२००७/१८२/०४३सी/के-००२
डॉ. भालचंद्र सखाराम मराठे
मु. पो. मुटाट, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१९.**

२९७१/६४७/०९०ई/के-००९
मनोहर विष्णू मराठे
मु. पो. पडेल, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०३.**

८५५/४३७एच/के-०५७
डॉ. सुधीर विष्णू मराठे
डॉ. मराठे दवाखाना, मु. पो. ता. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

३१७२/८५३/४४१ई/के-०५७
गोपाळ बाळकृष्ण मराठे
मु. पो. भिरवंडे, ता. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

३१७०/८५१/४३८डी/के-०५७
श्रीराम दामोदर मराठे
मु. पो. हरकुल बुद्रुक, ता. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६२४.**

३१७३/८५४/४३८एफ/के-०५७
रविकांत हरी मराठे
मु. पो. हरकुल बुद्रुक, ता. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६२४.**

३२९१/९६६/४९७एच/के-०६७
भालचंद्र पी. मराठे
वेशीवाडे, मु. पो. तुळस,
ता. वेंगुर्ले, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१५.**

३२९६/९७१/४३७जी/के-०५७
विजयकुमार विष्णू मराठे
श्रेयस बिल्डींग, बिजलीनगर, मराठा मंडळ जवळ,
कणकवली, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

२९६७/६५४/०४३डी/के-००२
डॉ. किरण भालचंद्र मराठे
टिळक वाडी, मु. पो. जामसंडे, ता. देवगड,
जामसंडे, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०३.**

२२५३/३१६/०८७ई/के-००९
दिनकर गोविंद मराठे
मु. पो. पडेल (खालचा वठार),
ता. देवगड, **जि. सिंधुदुर्ग - ४१६ ८०४.**

२९२८/६४९/०९२ए/के-००९
विष्णू दत्तात्रय मराठे
मु. पो. पडेल, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०४.**

३०७०/७६४/०१९एफ/के-००१
दिगंबर सीताराम मराठे
मु. पो. पुरळ, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०५.**

३०७२/७६६/०२३बी/के-००१
सुधाकर रामचंद्र मराठे
मु. पो. पुरळ, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०५.**

२९७५/६५१/०२१एन१/के-००१
भास्कर दत्तात्रय मराठे
मु. पो. वाडा, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०५.**

२९३४/६११/०९१जीएस/के-००९
सौ. कल्पना बापू केळकर
मु. पो. दाभोळे, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८१२.**

२९८१/६५२/११९सीएस/के-०१५
सौ. पार्वती शंकर मेहेंदळे
मु. पाट थर, पो. इलाये, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१२.**

३२९५/९७०/४३९जे/के-०५७
सुरेश राजाराम मराठे
मु. पो. हरकुल बुद्रुक, ता. कणकवली,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६०२.**

३२८२/९५७/४४९डी/के-०६०
श्रीपाद आर. मराठे
मु. पो. मळेवाड, ता. सावंतवाडी,
मालेवाड, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१०.**

२४७६/४६३/११४ए/के-०१५
भास्कर दिनकर मराठे
मु. खुडीपाट, पो. खुडी, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६११.**

२९५६/६४८/०९१के/के-००९
माधव रघुनाथ मराठे
मु. पो. पडेल, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०४.**

२४१७/१९९/०२४ई/के-००१
नारायण श्रीधर मराठे
मु. पो. पुरळ, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०५.**

३०७१/७६५/०२२डी/के-००१
नारायण रामचंद्र मराठे
मु. पो. पुरळ, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०५.**

२९६६/६५०/०८८के/के-००९
गजानन नारायण मराठे
मु. पो. वाडा, ता. देवगड,
वाडा, **जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०५.**

३०७५/७७०/०८९बी/के-००९
विश्वनाथ नारायण मराठे
मु. पो. वाडा, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ८०५.**

२९७९/६४६/०८७जीएस/के-००९
सौ. प्रतिभा मोरेश्वर गोगटे
मु. पाट थर, पो. इलये, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१२.**

२९७६/६५३/११४एएस/के-०१५
सौ. शालिनी अनंत गोगटे
मु. पाट थर, पो. इलये, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१२.**

३२९२/९६७/०९१एनएस/के-००९
सौ. अर्चना काशिनाथ केळकर
द्वारा नेने दुकानदार, मु. पो. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१३.**

३२९३/९६८/११४जी/के-०१५
प्रकाश बी. मराठे
मु. पो. दहीगाव, ता. देवगड,
**जि. सिंधुदुर्ग ४१६ ६१३.**

## कोल्हापूर जिल्हा

२०८८/४४५/२१९जे/के-०३२
सदानंद (नंदकुमार) दिनकर मराठे
२२५७/ए, जीवबनाना जाधव कॉम्प्लेक्स,
बाबू जमाल तालीम जवळ, **कोल्हापूर ४१६ ०१२.**

१२१२/५५७सीडी/के-०५४
सौ. अर्चना अरुण कुलकर्णी
द्वारा डॉ. ए. पी. कुलकर्णी, कळंबा रींग रोड,
जकत नाका जवळ, **कोल्हापूर ४१६ ००७.**

१२१२/५५७/४२७सीडी/के-०५४
अरुण बाळकृष्ण मराठे
११३/११४, मंडलिक पार्क, १३वी गल्ली,
राजारामपुरी, **कोल्हापूर.**

२०७५/६३७/२८४एम/के-०३५
शशिकांत गणेश मराठे
१२३७/ए, ए वॉर्ड, गणेश अपार्टमेंट, साकोली,
शिवाजी पेठ, ब्रह्मेश्वर बाग, **कोल्हापूर ४१६ ०१२.**

३२१३/८९६/०२३पी/के-००१
उदय बाळकृष्ण मराठे
उदय प्रोसेस ब्लॉक मेकर्स, २३२ बी, खार्डेकर लेन,
जानकी सदन, **कोल्हापूर ४१६ ०१२.**

३२१५/८९७/२५५ई/के-०३४
दिनेश श्रीहरी मराठे
४/३५, आडमुठे बिल्डींग, ममता बेकरी समोर,
इचलकरंजी, **कोल्हापूर ४१६ ११५.**

३२१६/८९८/४०५एन/के-०४९
मेघश्याम नारायण मराठे
वॉर्ड २, हाऊस नं. २०३, अयोध गावबाग,
इचलकरंजी, **कोल्हापूर ४१६ ११५.**

## सोलापूर जिल्हा

२४२८/४४३/२७५ए/के-०३५
वसंत बाळकृष्ण मराठे
१४, श्री ब्रह्म चैतन्य नगर, सुंदरम नगरच्या पुढे,
**सोलापूर ४१३ ००४** (विजापूर रोड)

३१७६/८५८/१४०ए/के-०२२
दिवाकर विष्णू मराठे
१९/१, स्वामी समर्थ सोसायटी,
प्रभाकर महाराज मंदिराजवळ, **सोलापूर ४१३ ००२.**

## सातारा जिल्हा

२९५१/६३४/०३०बी/के-००१
विजय श्रीधर मराठे
५२८-ए, पारसनीस कॉलनी,
सदर बाजार, **सातारा ४१५ ००१.**

२५६६/४५२/२२४एच/के-०३२
डॉ. वासुदेव मोरेश्वर मराठे
केदार छाया, सदर बाजार, कृष्णराव देसाई कॉलनी,
**सातारा ४१५ ००२.**

२११३/१/२०एफ/के-००१
सुधीर श्रीपाद मराठे
१/१३, प्रकाशनगर अपार्टमेंट, कॉटेज हॉस्पिटल
शेजारी, कराड, **जि. सातारा ४१५ ११०.**

२४९२/१९५/५५३एल/के-०७२
गोपाल दामोदर मराठे
द्वारा यादव, २०७, बी/७, पुष्पांजली, दत्ता चौक,
शनिवार पेठ, कराड, **जि. सातारा ४१५ ११०.**

२४८२/९०१/२२२जी/के-०३२
डॉ. विवेक प्रभाकर मराठे
१४३२ (नवी) रविवार पेठ, वाई,
**जि. सातारा ४१२ ८०३.**

९८६ नवीन
मधुकर वासुदेव चक्रदेव
४०९/४/१३ कौस्तुभ, देसाई वाडी,
सदर बाझार, **सातारा ४१५ ००१.**

## अहमदनगर जिल्हा

९७८/११९/के-०१५
विजय गोपाळ मराठे
प्रथमेश अपार्टमेंट, मोहनबाग, दिल्ली गेट,
**अहमदनगर ४१४ ००१.**

८७०/०२९एफ/के-००१
सौ. अनुजा सुहास बर्वे
द्वारा एस. एम. बर्वे, 'अक्षता' - २३, सहकारनगर,
सकपाळ हॉस्पिटल समोर, **अहमदनगर ४१४ ००१.**

# पुण्यातील मराठे प्रतिष्ठान वर्धापन दिन सोहळा (२६.१.०५)

**- श्रीमती शुभदा शंकर**, पुणे

मराठे प्रतिष्ठानचा २६वा वर्धापनदिन समारंभ बुधवार दि. २६.१.२००५ रोजी वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या सभागृहात दुपारी ४.३० ते ८.३० या वेळात संपन्न झाला.

सौ. निर्मला प्रभाकर मराठे यांनी कार्यक्रमासाठी आलेल्या मान्यवरांचे व उपस्थितांचे स्वागत केले व कार्यक्रमाची रूपरेखा सांगितली. सौ. हर्षला मराठे-देव यांच्या ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. तसेच रोहन मराठी यांनी स्वातंत्र्यगीत गायिले.

प्रकाश हे प्रगतीचे व चैतन्याचे प्रतीक आहे आणि म्हणूनच दीपप्रज्वलनाचे महत्त्व आहे. तर आजच्या **कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण बाळकृष्ण** (पृ.५५९) यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून पुढील कार्यक्रम सुरू झाले.

यानंतर **प्रभाकर गणेश** (पृ.६१) यांचे योगाचे महत्व यावर अनुभव कथन व मार्गदर्शन झाले. श्री. प्रभाकर मराठे हे मेकॅनिकल इंजिनियर असून त्यांनी निरनिराळ्या इंजिनियरिंग कंपन्यांत फॅक्टरी मॅनेजर व ऑल इंडिया सेल्स मॅनेजर म्हणून काम केले. बाबा आमटे यांच्या संपर्कात आल्याने कुष्ठरोगासाठी उद्योग व प्रशिक्षण केंद्र उभारणी याबाबतचा प्रोजेक्ट रिपोर्ट करून दिला व ३४ लाखाची ग्रँड मिळवून दिली. योगासनात त्यांना सिल्व्हर मेडल मिळाले आहे. गेली चौदा वर्षे योगासनाची गोडी वाढावी म्हणून स्पर्धा आयोजित करतात व भेटवस्तू देतात. सध्या सोलर एनर्जीवर काम करीत आहेत.

श्री. प्रभाकर मराठे योगाचे महत्व सांगताना म्हणाले योगशास्त्र सर्वस्पर्शी आहे. वेदातही त्याचे महत्त्व सांगितले आहे. योगात अष्टांगानी अभ्यास व यमनियम जाणून अभ्यास केल्यास जीवनात शारीरिक व मानसिक समतोल व एकाग्रता राखता येते. योगाची सुरवात कोणत्याही वयात करता येते. त्यानंतर काही प्रात्याक्षिके करून दाखविण्यात आली.

यानंतर संदेशपत्राचे वाचन करण्यात आले. **महाराष्ट्र चित्पावन संघाचे कार्याध्यक्ष हरिभाऊ चितळे** यांनी पुण्याच्या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. **प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. आनंद मराठे** यांनी शुभेच्छा पाठविल्या. **पुण्याचे विंगकमांडर मराठे** तसेच **गोव्यातून श्री. कालिदास मराठे** यांच्या शुभेच्छा वाचून दाखवण्यात आल्या.

> ### *योगासनांना वयाचे बंधन नाही*
>
> सर्वांगीण स्वास्थ्यासाठी योगासनांसारखा दुसरा व्यायाम नाही; शरीरातल्या विविध ग्रंथींना फक्त योगासनामुळेच व्यायाम मिळतो, दुसऱ्या कोणत्याहि व्यायामप्रकारांत हा फायदा होत नाही असे सांगून प्रभाकर मराठे म्हणाले की सूर्यनमस्कार हा योगासनांकडे जाण्याचा चांगला मार्ग आहे. सूर्यनमस्कारांत ४-५ योगासने समाविष्ट आहेत.
>
> योगासने कधी सुरू करावी याबाबत वयाचे काहीहि बंधन नाही असे सांगून ते म्हणाले की मी पन्नाशीत कंबरदुखी, सांधेदुखीने त्रस्त झाल्याने योगासनांना सुरवात केली, सातत्य ठेवले आणि आज सत्तरीतहि मला असा कोणताहि त्रास नाही.
>
> आपण टी.व्ही. वरील आसनांची प्रात्याक्षिक पाहतो. प्रात्याक्षिके दाखवणारे सराईत असतात. त्यामुळे पाहताना आपल्याला फार सोपे वाटते. पण आपण करायला लागलो की जमत नाही. यामुळे नाउमेद न होता ओढाताण करू नये. सततच्या सरावाने हळूहळू महिनाभरात आपल्यालाहि आसने चांगली जमू लागतील असा दिलासा त्यांनी नव्याने योगासने करू इच्छिणाऱ्यांना दिला.

सौ. नीलांबरी मराठे यांनी गोवा अधिवेशनासंबंधी पुणेकरांसाठी निवेदन केले. दि. ३० एप्रिल व १ मे या दिवशी गोव्यात मराठे प्रतिष्ठानचे अधिवेशन आहे. तत्पूर्वी २८ व २९ एप्रिल रोजी गोवादर्शन कार्यक्रम ठरविण्याचा विचार असल्याचे सांगून २५ फेब्रुवारीपर्यंत आवश्यक रक्कम (अंदाजे रु. १५००) देऊन पुणेकरांनी नांवे नोंदवावी असे त्यांनी आवाहन केले.

यानंतर सन्माननीय अध्यक्ष श्री. ना. बा. मराठे यांचा परिचय करून देण्यात आला. (१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडिज - सिमला व वैदिक संशोधन मंडळ, पुणे येथे ग्रंथपाल म्हणून काम पाहिले. (२) राष्ट्रीय ग्रंथसूची समन्वयक - कलकत्ता तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - बाई प्रमोदसिंधु ग्रंथ संदर्भ - सेवा आणि संदर्भ ग्रंथसूचिशास्त्र सागर वार्षिक इ. चे संपादक म्हणून उत्तम कार्य केलेले आहे. (३) महाभारत सांस्कृतिक सूची पुणे भारतीय ग्रंथालयाचा इतिहास तसेच धर्मकोश प्रकल्प विशेष अधिकारी सहसंपादक म्हणून काम केले. पुण्याच्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेचे ग्रंथपरीक्षक म्हणून काम केले.

महाराष्ट्र मंडळ हाजरा रोड कलकत्ता याचे अध्यक्ष होते.

'ना. बां.'चा सत्कार हितगुजचे संपादक लक्ष्मण शंकर यांचे हस्ते करण्याचे ठरविले होते. परंतु त्यांनी स्थानिक लोकांच्या हस्ते करावा असे सुचवले म्हणून श्री. श्रीराम व्यंकटेश मराठे यांच्या हस्ते अध्यक्षांचा शाल, श्रीफळ, पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच आजच्या कार्यक्रमासाठी ज्या कुलबांधव/भगिनींचे सहकार्य लाभले. त्यांचाहि अध्यक्षांच्या हस्ते श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांची नावे - **निमंत्रण पत्रे लिहिणारे** सौ. माधुरी कमलाकर जाईल, विजय भालचंद्र मराठे, जयंत रघुनाथ मराठे, मीनानाथ लक्ष्मण मराठे, प्रभाकर ग. मराठे, निर्मला श्रीपाद मराठे. **रांगोळी रेखाटनसाठी** सौ. अदिती अतुल मराठे, **माईक व्यवस्थेबद्दल** श्री. शरद खांबेटे, **वृत्त लेखिका** शुभदा शंकर मराठे तसेच **योगाचे अनुभव कथन करणारे श्री. प्रभाकर गणेश मराठे आणि कीर्तनकार अनुराधा रघुनाथ देशपांडे** व त्यांचे सहकारी सौ. देसाई व श्री. कांड, **अल्पोपहार देणारे श्री. मंदार मोहन मराठे** - बालाजी फूडस्, **तिळगूळ वाटप**

**करणारे श्री. वा. ग. मराठे, गणेश स्तवन करणाऱ्या हर्षदा मराठे-देव, स्वातंत्र्य गीत गायक रोहन प्रमोद मराठे** यांचाहि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात श्री. ना. बा. मराठे म्हणाले - २५ वर्षातील सर्व मराठे कुलबांधवांचे एकत्रीकरण व्हावे यासाठी भ्रमरध्वनी (मोबाईल) जसे कार्य करतो ते कार्य हितगुज ने करावे. परदेशात देखील सुनील मराठे कार्य करतात. त्यांनी मराठी साहित्य संमेलन भरवून आर्थिक उभारणी केली. क्रय विक्रय शक्ती आपल्याकडे असावी. गुणवंताचे सत्कार, शैक्षणिक मदत करावे, पुढील ५ वर्षातील आर्थिक नियोजन आधीच करावे. गेल्या शतकातील ज्या मराठे कुलबांधवांनी उत्तुंग कार्य केले त्यांची यादी असावी. उदाहरणादाखल राम मराठे, अनुराधा मराठे, संजीवनी मराठे यांची नावे सांगितली. दिल्लीतील दिनेश मराठे यांना सरकारने युनेस्कोत पाठविले. चित्पावन मराठे म्हणताच वेगळी भावना लोकांच्यात असते ती दूर करावी. मराठे प्रतिष्ठानची स्वतःची वास्तू असावी. व्यक्ती, कुटुंब, कुल, प्रांगणातील देश, विदेश असे एकत्रीकरण करावे.

त्यांच्या अपेक्षातील बऱ्याचशा गोष्टी सध्या मराठे प्रतिष्ठान करीत असल्याचे श्री. लक्ष्मण शंकर मराठे यांनी सांगितले.

पुढील कार्यक्रम होता **श्रीमती अनुराधा देशपांडे यांचे** 'आद्य क्रांतिवीर' उमाजी नाईक यांच्यावर सुश्राव्य कीर्तन. अनुराधाताई चक्रदेवांची माहेरवाशीण आहे. त्यांना उज्जनेत २००२ मध्ये 'कीर्तनरत्न' पदवी मिळाली आहे. आतापर्यंत त्यांची १४५० कीर्तने झाली. गीतदत्तात्रय, धन्य तो आळंदी, संगीत हरिपाठ ही खंडकाव्ये स्वतः पेटीवादन करून निवेदन करतात. गौळण, भारुडे सादर करतात. सध्या त्या पेटीवादन, भक्ती संगीत, सुगम संगीत, कीर्तन याचेही शिक्षण इतरांस देतात. आपल्या कीर्तनात त्यांनी पूर्व रंग, उत्तर रंग अतिशय सुंदरपणे खुलवून सांगितला.

शेवटी श्री. मंदार मराठे - बालाजी फुडस् यांचा सुंदर रुचीपूर्ण अल्पोहार घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. ***

### वर्धापनदिन सोहळ्यात मिळालेल्या रकमा

अ) **२६ जानेवारीच्या कार्यक्रमासाठी**
१. विंग कमांडर य. ल. मराठे रु. ५००
२. श्री. वसंत कृष्णाजी मराठे रु. १०१
३. श्रीमती शुभदा शंकर मराठे रु. १०१
४. श्री. विष्णू रामचंद्र मराठे रु. ५०

ब) **हितगुज वर्गणी -**
माधव दिनकर मराठे (पृ.८७)
डी १७, श्री. शंकर नगरी को. ऑ. हौ. सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८. रु. २००

क) **आजीव सभासद वर्गणी**
सौ. आरती दिलीप गोखले
पार्वती हाईट्स्, डहाणूकर कॉलनी, पुणे ४११ ०३८. रु. १००

# ब्राह्मणांच्या कामगिरीचा वस्तुनिष्ठ इतिहास-ग्रंथ हवा

- **हनुमंत मोरेश्वर** (पृ.५३७), पुणे

*ब्राह्मणांनी बहुजन समाजावर अन्याय केला, त्यांनी पेशवाई बुडविली, समाजात असणाऱ्या सर्व वाईट गोष्टींना ब्राह्मणच जबाबदार आहेत, यासारख्या आक्रमक भूमिका घेत ब्राह्मणांना टार्गेट केलं जातंय.*

*अशा आरोपात सत्य आणि तथ्य किती, ब्राह्मणांनी आपली आचार-विचार पद्धती/मनोभूमिका बदलून घेतली तरी ब्राह्मणांकडे बघण्याची दृष्टी ब्राह्मणेतर का बदलून घेत नाहीत, अशा अनेक प्रश्नांचा मूलगामी परामर्ष घेणारा **प्रदीर्घ लेख 'हमों'नी २००४ च्या 'किस्त्रीम' या दिवाळी अंकांत लिहिला आहे.** या लेखांतील त्यांचा प्रस्ताव आपल्या प्रतिक्रियांसाठी खाली दिला आहे. - संपादक*

जातवार आरक्षणामुळे जातींची जाणीव प्रखर होऊ लागली आहे. भारतीय मनोरचनेचे आधुनिकीकरण करण्याच्या ब्राह्मण मंडळींच्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष करून ब्राह्मणांना सर्रास प्रतिगामी, सुधारणाविरोधक आणि बहुसंख्य जनतेचे जातीय शत्रू ठरविण्यात येत आहे. गेल्या पंचवीस वर्षात ही प्रक्रिया वेगाने घडत गेली

नव्या पिढीचे ब्राह्मणेतर अभ्यासक एक मध्यवर्ती सूत्र आधीच पक्के ठरवून देशाच्या भूतकाळाचे विश्लेषण करू लागले आहेत. ते सूत्र म्हणजे देशाच्या इतिहासात ज्या ज्या वाईट गोष्टी झाल्या त्या त्या सर्व ब्राह्मणांनी केल्या आणि ज्या ज्या चांगल्या गोष्टी घडल्या त्या त्या सर्व ब्राह्मणेतरांनीच केल्या; पण त्याचे श्रेय मात्र ब्राह्मणांनी उपटले. कारण इतिहास ब्राह्मणांनी लिहिला.

काही अभ्यासक सांगू लागले आहेत की ब्राह्मण हे आक्रमक आर्यांचे वंशज आहेत, ते भारतीय नाहीत. ब्राह्मण हिंदूही नाहीत. कारण, आर्य वैदिक होते. आर्यांच्या आक्रमणाच्यावेळी जे एतद्देशीय मूलनिवासी होते तेच फक्त हिंदू! हे इतिहास लेखन हसण्यावारी घालवण्यासारखे नाही.

देशभक्तीच्या, स्वार्थत्यागाच्या व विद्यार्जनाच्या क्षेत्रात ब्राह्मणांनी केलेली कामगिरी आणि योगदानाचा इतिहास ब्राह्मणेतरांना कोण सांगणार? आणि ब्राह्मणांना तरी कोण सांगणार? कारण, नवइतिहासकार तो दडवूनच ठेवणार हे स्पष्ट आहे.

या परिस्थितीत, एखादा विश्वासार्ह संदर्भग्रंथ ब्राह्मण तरुणांच्या हाती असला पाहिजे. केवळ ब्राह्मण तरुणांच्याच नव्हे, तर ब्राह्मणेतर तरुणांच्या हातीही. ब्राह्मणद्वेषाच्या भावनेचा पगडा बसून सर्वच ब्राह्मणेतर तरुण-तरुणींनी विचारशक्तीला फाटा दिलेला नसेल अशी आशा बाळगून मी हे लिहीत आहे.

ब्राह्मणांवर करण्यात येणाऱ्या आरोपांना उत्तरे देण्याच्या हेतूने **मी स्वतः एखादा ग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या विचारात आहे.** सर्व पुस्तक मी लिहिणार नाही. कारण सर्व विषयांचा माझा अभ्यास नाही; पण या आरोपांना उत्तरे देण्याइतपत ज्यांचा अभ्यास आहे अशा

# कानडा-कर्नाटक मधील चित्पावन मराठे

**- मोहन सदाशिव** (पृ.३६५), खार, मुंबई

मी ऑक्टोबर २००४ मध्ये बंगलोरला मुलीकडे गेलो होतो. मी तिथल्या महाराष्ट्र मंडळातून माहिती मिळवून (कै.) रंगनाथ मराठेंचे चिरंजीव गजानन (ऊर्फ बंडोपंत) ह्यांना भेटलो. श्री. बंडोपंत नॅशनल को-ऑप. बँकेत ब्रँच मॅनेजर आहेत. तसेच विशाल एंटरप्राईजेस नावाने औद्योगिक वॉटर फिल्टर्सचा व्यवसाय करतात. त्यांनी ५०० वर्षापूर्वी पूर्वज दक्षिण कानडात स्थायिक झाल्याचे सांगितले. बंडोपंतानी त्यांच्या घरची माहिती दिली. त्यांना मराठे प्रतिष्ठानचे सभासद करुन घेतले आहे.

बंगलोरहून आल्यावर मी कुलवृत्तांताली कानडा-कर्नाटक मधील मराठे घराण्यांची माहिती पाहता असे दिसले की प्रत्येक घरातील मुला-मुलींची लग्ने स्थानिक कोकणस्थांशी झाली आहेत.

मी जानेवारीत (२००५) संक्रांतीला परत बंगलोरला गेलो. पूर्वसूचना दिल्याने बंडोपंतानी तेथील १०-१२ मराठे मंडळींना एकत्र केले. तिळगुळ नाश्ता चहापाणी झाले. चित्पावन ब्राह्मण संघाचे (बंगलोर शाखा) कार्यवाह श्री. दिवाकर डोंगरे एम. यांच्या घर-कम-चित्पावन संघ कार्यालयात बैठक पार पडली. तेथे मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे - दक्षिण कानडा, उत्तर कानडा म्हणजे मंगलोर, उडुपी, कारकळ ह्या टापूत चित्पावन मंडळी शेकडो वर्षापूर्वी स्थायिक झाली. श्री. दिवाकर डोंगरेंच्या म्हणण्याप्रमाणे चित्पावन पंजाब, राजस्थान, गुजरात, कोंकण, गोवा असे उतरत कानडात स्थायिक झाले. सुपारीच्या बागा मुख्य व्यवसाय.

घरातील बोलीभाषा व दोन चित्पावनांमधील भाषा चित्पावनी आहे. चित्पावनीला लिपी नाही. कर्नाटकात कानडी लिपीचा व ओघाने कानडीचा व्यवहारातील भाषा म्हणून वापर होतो. मंगलोरच्या कॉलेजातील प्राध्यापिक जोशि ह्यांनी तयार केलेले चित्पावनी X कानडी/मराठी म्हण्यांचे (म्हणी) पुस्तक मी घेतले. तसेच चित्पावनी X कानडी/मराठी शब्दकोश तयार असून छापील पुस्तक (ह्याच लेखिकेचे) २/४ महिन्यात मिळेल असे सांगितले.

श्री. डोंगरे ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे चित्पावन मंडळी कर्नाटकात बरीच आहेत. पण एकेका आडनावाची मंडळी थोडी आहेत. बंगलोरात भिडे पुष्कळ आहेत. त्यांच्यात दोन विभाग आहेत. त्याखालोखाल मराठे आहेत. चित्पावन संघ ही सर्वांची संघटना असून तिच्या शाखा हुबळी, म्हैसूर, बंगलोर इ. २०-२५ ठिकाणी आहेत. त्यांची चित्पावनी कोकणीपेक्षा वेगळी आहे.

ही चित्पावन मंडळी मुंबई-पुण्याकडच्या चित्पावनांच्या मानाने गरीब आहेत. त्यांच्या मुलांना उच्च/परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, मुंबईत भेटीस आल्यावर उतरण्यासाठी जागा असे उपलब्ध होईल का अशी विचारणा केली. मराठे प्रतिष्ठानच्या सध्याच्या स्थितीत मी ठोस आश्वासन देण्यास असमर्थ आहे असे सांगितले. मात्र मराठे कुळाचे काम व चित्पावन संघाचे काम हातात हात घालन चालेले पाहिजे असे सांगितले.

माझे निवेदन व चर्चा इंग्रजीत झाली. श्री. डोंगरेंनी त्यांचेशी पत्रव्यवहार इंग्रजीत करावा असे सांगितले. ***

---

*इतिहास-ग्रंथ हवा....(मागील पानावरून)*

अभ्यासकांकडून या विषयांवर लेख लिहून घेण्याचे काम मी करू शकेन. माझा संपादनाचा अनुभव मी त्यासाठी वापरीन.

**अशा पुस्तकाची/पुस्तकांची गरज आहे काय हे मला वाचकांनी कळवावे.** मिळणाऱ्या प्रतिसादावरूनच पुढील काम सुरू करायचे की नाही हे मी ठरवीन. पत्ता : ४ रामकृष्ण अपार्टमेंट्स, आनंद पार्क सोसायटीसमोर शंकरशेट रोड, पुणे ४११ ०३७. (दूरध्वनी : २६४३४६४५) ***

---

# माझी लोकल कहाणी

**सौ. वृषाली वामन** (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई

*मुंबईच्या लोकलने प्रवास करून ऑफिसला जाणाऱ्या प्रत्येक गृहिणीला ही आपलीच कहाणी वाटावी अशी ही ३३ वर्षांची वाटचाल-नव्हे, 'लोकल' चाल - संपादक*

मी गेली ३३ वर्षे लोकलने प्रवास करत आहे. त्यातील २९ वर्ष माझे ९.३० च्या गोरेगाव लोकलशी नाते जोडलेले आहे. मधली चार वर्षे मी नेरुळवरून बेलापूर लोकलने प्रवास केला.

माझं लग्न १९७३ साली झालं. लग्न ठरल्यानंतर केळवण, रुखवतासाठी भरतकाम माझ्या मैत्रिणींनी केले. मी सगळ्यांची मामी किंवा काकू झाले आहे. पण माझी गोरेगाव लोकल मात्र तीच आहे. माझ्या मुलाच्या मुंजीला आलेल्या मैत्रिणी त्याच्या लग्नालाही आल्या होत्या इतकी आमची मैत्री कायम आहे. इथं जात-पात, वय किंवा ऑफीसमधील तुमचा हुद्दा आड येत नाही. प्रवासातील अर्धा पाऊण तास मजेत जातो.

आम्ही दिवाळी फंड चालवले. त्यातील पैशांचे मी मुलाला शाळेत असताना टेबल आणले जे अजून आहे. दुसरी गोष्ट त्याच्या मुंजीला मैत्रिणींनी मला स्टीलचा डबा आणि इतर वस्तू आहेर दिल्या. त्या डब्यावर लिहिलं होतं From Second Goregaon Local. तो डबा बघितला की माझ्या त्यावेळच्या ग्रुपची आठवण होते.

मी नेरुळला रहायला गेले. तिथे चार वर्षात नवीन मैत्रिणी झाल्या. तिथे मी लोकरीचं विणकाम शिकले. नेरुळ ते C.S.T. प्रवासात देवाची भजने म्हणणे, कधी विणकाम व थोडी झोप होत असे. एकदा मी ३ महिने आजारी होते. माझ्या मैत्रिणी माझ्या घरी चौकशीसाठी येत. नेरुळ सोडताना मी त्यांना माझ्या घरी फराळाला बोलावले. त्यांनी मला दोन चांदीची निरांजने दिली.

माझ्या आताच्या मैत्रिणींनी मुलाच्या लग्नात मला चापाची नथ दिली. ती मी वापरतेच पण माझी सूनही घालते.

यंदाही आम्ही संध्याकाळच्या चर्चगेटहून ६.३०ला सुटणाऱ्या गाडीत २००४ सालाला निरोप म्हणून पार्टी केली. १५ जणींचा ग्रुप - चर्चगेट पासून जोगेश्वरी पर्यंत खाणं आणि गाणं यात वेळ कसा गेला ते समजलंच नाही.

माझ्या घरचे मला म्हणतात, ''आता तू नोकरी सोड पण तुझ्या लोकलच्या मैत्रिणींना भेटायला जा, नाहीतर तुला चैन पडणार नाही.'' अशी ही माझी लोकल कहाणी जी माझ्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे. ***

# ग्राहका जागा हो

**- वसुंधरा देवधर**, विलेपार्ले, मुंबई

*वसुंधरा देवधर ह्या गेल्या ६ वर्षांपासून मुंबई ग्राहक पंचायतीच्या ग्राहक शिक्षण व ग्राहक संरक्षण विभागात कार्यरत आहेत.*

*म. प्र. च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य हेमंत महादेव यांच्या विनंतीवरून आपल्या सर्वांच्याच या जिव्हाळ्याच्या विषयावर हितगुजसाठी लेखन करण्याचे त्यांनी मान्य केले. सर्व कुलबांधवांतर्फे वसुंधरा देवधर यांचे आभार - संपादक*

आपण भारतीय मोठे उत्सव प्रिय. आता आमच्या पारंपारिक उत्सवांचे स्वरूप - ते साजरे करण्याच्या पद्धती बदलत आहेत. नवीन उत्सव निरनिराळ्या 'डे' च्या रूपाने साजरे होत आहेत. आमच्या या उत्सवी वृत्तीचा फायदा निरनिराळ्या कल्पक प्रकारांनी उत्पादक व व्यापारी करून घेत आहेत. कारण उत्सव म्हणजे खरेदी.

ग्राहकांच्या मानसिकतेचा अभ्यास करून त्यांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी जाहिरात माध्यमातून सतत ग्राहकांच्या डोळ्यासमोर राहणेचे विक्रीतंत्र अत्यंत हिरीरीने राबवले जात आहे. त्याला 'बळी' न पडता त्यावर जर स्वार व्हायचे असेल, आपल्या कष्टाच्या कमाईला बारा वाटा आपोआप फुटू न देता लगाम आपल्याच हातात ठेवायचा असेल, तर तमाम ग्राहकांनी 'जागे' व्हायला हवे.

आता हे 'तमाम ग्राहक' म्हणजे कोण? तर सगळी जनता. साक्षर-निरक्षर, श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, बालके-वृद्ध - सगळे सगळे ग्राहक असतात. जन्मल्यापासूनच काय तर गर्भस्थ बालकही ग्राहक असते. आई जेव्हा त्या बाळासाठी म्हणून खास काही औषधे-टॉनिके इ. घेते, त्यावेळी ते बाळ ग्राहक असते.

म्हणजेच आजच्या ह्या बाजारचलित जगात आपली जबाबदारी आणखीनच वाढते. ती कोणती? तर आपले हक्क सांभाळण्याची, आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची आणि त्याद्वारे केवळ स्वत:च्याच नव्हे तर राष्ट्रीय संपत्तीचेही रक्षण करण्याची.

ग्राहकांचे मूलभूत हक्क - २४ डिसेंबर हा भारतात राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून पाळला जातो. १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिन. १९६० सालच्या अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणूक मोहिमेत 'जॉन केनेडी' ह्यांनी 'ग्राहक चळवळीला आपण पाठिंबा देऊ' असं आश्वासन दिलं. त्यानुसार १९६२ सालच्या १५ मार्च रोजी अमेरिकन काँग्रेस समोर ग्राहक हक्कांबाबतचं भाषम केलं. अमेरिकन ग्राहकांना चार मूलभूत हक्क तेव्हा मिळाले. (१) सुरक्षिततेचा हक्क, (२) माहिती मिळवण्याचा हक्क, (३) वस्तू व सेवा ह्यांच्या निवडीचा हक्क आणि (४) मत ऐकले जाण्याचा हक्क

१५ मार्च हा 'जागतिक ग्राहक हक्क दिन' म्हणून १९८३ पासून जगभर मानला जातो. 'Consumer's International' ही विविध देशातील ग्राहकांच्या हक्कांबाबत जागरूक असणाऱ्या संस्थांची शिखर संस्था जागतिक पातळीवर कार्यरत आहे. तिच्या कामाचे स्वरूप व आवाका फार मोठा आहे. एशिया पॅसिफिक क्षेत्रासाठी तिचे स्वतंत्र कार्यालय आहे.

आपल्या देशातला ग्राहक संरक्षण कायदा २४ डिसेंबर १९८६ रोजी संमत झाला. म्हणून २४ डिसेंबर हा भारतभर 'ग्राहक दिन' म्हणून साजरा होतो. हा कायदा संमत होण्यापूर्वी ग्राहकांची फसवणूक किंवा नुकसान ह्यांना कारणीभूत होणाऱ्या व्यक्ती अगर संस्थांविरुद्ध न्यायालयाचे दरवाजे ठोठावता येत होते. पण एक तर ते काम फारच वेळखाऊ व खर्चिक असे. शिवाय ज्याचे नुकसान झाले त्या ग्राहकाला 'भरपाई' मिळण्याची कोणतीच सोय नव्हती.

आपल्या देशातला कायदा ग्राहकाला अधिक हक्क देणारा, त्याची काळजी घेणारा आहे. उपरोक्त चार हक्कांखेरीज 'तक्रार निवारण' आणि 'ग्राहक-शिक्षण' हे आणखी दोन हक्क ह्या कायद्याने आपल्याला मिळाले. आता तक्रार निवारणाचा हक्क दिल्यावर तक्रार-निवारण-यंत्रणा उभारणे आले. ती त्रिस्तरीय निवारण यंत्रणा जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर कार्यान्वित करण्यात आली आहे.

कर भरतो म्हणून आपण महानगरपालिका अगर नगरपालिकेचे ग्राहक ठरत नाही. पण जर एखाद्या कामासाठी वेगळे पैसे आकारले जात असतील तर त्या कामापुरते 'ग्राहकत्व' आपणास मिळते. उदाहरणार्थ: आपल्या घराच्या आवारातील सेप्टिकटँक साफ करण्यासाठी श्री. अरुण शर्मा यांनी अजमेर नगरपालिकेकडे रु. १५० भरून अर्ज केला. दि. १४.१०.१९९२. मात्र बरेच दिवस कुणीच आले नाही. स्वच्छता व्हायला हवी म्हणून श्री. शर्मा ह्यांनी ५०० रु. देऊन खाजगी कंत्राटदाराकडून साफसफाई करुन घेतली. नंतर मन:स्ताप व आरोग्यहानी करणारी 'सेवेतील त्रुटी' झाली म्हणून नगरपालिकेविरुद्ध 'जिल्हामंचा'त दावा दाखल केला. रु. २५०० ची नुकसान भरपाई मागितली. शिवाय रु. ५०० चा प्रत्यक्ष खर्च यांच्या बाजूने निकाल झाला. सेप्टिक

स्वच्छता ही केवळ जिल्हा व नंतर राज्य पातळीवर शर्मा कुटुंबीय नव्हे तर परिसर स्वच्छता व आरोग्याशी निगडीत आहे. हे नगरपालिकांचे कामच आहे. १४.१०.९२ रोजी फी घेऊन ते काम करण्याची जाग जर डिसेंबर ९३ मध्ये येत असेल तर ही 'सेवेतील त्रुटी' झाली आहे असे राज्य आयोगाने ठामपणे सांगितले. इथे प्रश्न रु. १५० अगर रु. २५०० असा नसून कर्तव्यात कसूर करणाऱ्या नगरपालिकांना कसे वठणीवर आणता येईल हा आहे.

अशा प्रकारे विविध सेवा आणि वस्तूंबाबत जिल्हा मंचांकडे अनेक तक्रारी दाखल होतात. आणि ग्राहकांच्या बाजूने निर्णयही होतात. त्या विषयी पुढच्या अंकात. ★★★


### *आपली वेबसाईट*

आपण मराठे प्रतिष्ठानची वेबसाईट पाहिली काय? कृपया आपला अभिप्राय व काही सूचना असल्यास त्या जरूर कळवाव्या. आपल्या माहितीसाठी संकेतस्थळाचा संदर्भ : www.marathepratishthan.org

# मराठे प्रतिष्ठानला

*हार्दिक शुभेच्छा*






# व्ही. एम. ज्वेलर्स

**झवेरी बाजार, मुंबई**





## नवीन बजेट आणि इन्कम टॅक्स

प्रतिष्ठानचे पुण्यांतील सभासद **गजानन चिंतामण** (पृ.१२९) इन्कम टॅक्स डिपार्टमेंटमध्ये सुपरवायझर म्हणून काम करतात. **नवीन बजेट आणि इन्कम टॅक्स या विषयावर** म. प्र. च्या कार्यकारी मंडळाच्या सभेत १२.३.२००५ रोजी ते विवेचन करणार आहेत. इच्छूक कुलबांधवांनी हजर रहावे.

पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी इ. ठिकाणच्या कुलबांधवांनी त्यांचेशी संपर्क साधल्यास ते शनिवार-रविवारी (सुटीच्या दिवशी) या विषयावर विनामूल्य व्याख्याने देऊ इच्छितात. त्यांचा पत्ता : प्लॉट नं. ३४ अ, सार्थक, सेनादत्त कॉलनी, पुणे ४११०३० (फोन : २४३३१६५१) - संपादक

## या अंकात


१. **म.प्र.च्या ८व्या संमेलनाचे निमंत्रण**............ पृ.१
गोमंतक मराठे परिवार

२. **संमेलन कार्यक्रम पत्रिका** पृ.२

३. **कै. सुरेशभाऊ मराठे स्मृति सांस्कृतिक कार्यक्रम (२७.५.०५)**.............................. पृ.५
लक्ष्मण शंकर मराठे, मुलुंड, मुंबई

४. **गोमंतक मराठे परिवार संमेलन (१६ जानेवारी २००५)** पृ.६
प्रदीप अनंत मराठे, वेळगे-पाळी, गोवा

५. **पुण्यातील मराठे प्रतिष्ठान वर्धापन दिन सोहळा (१६.१.०५)**............................ पृ.११
श्रीमती शुभदा शंकर मराठे, पुणे

६. **ब्राह्मणांच्या कामगिरीचा वस्तुनिष्ठ इतिहास-ग्रंथ हवा**........................... पृ.१२
हनुमंत मोरेश्वर मराठे, पुणे

७. **कानडा-कर्नाटक मधील चित्पावन मराठे**....... पृ.१३
मोहन सदाशिव मराठे, खार, मुंबई

८. **माझी लोकल कहाणी**....................... पृ.१३
सौ. वृषाली वामन मराठे, जोगेश्वरी, मुंबई

९. **ग्राहका जागा हो**........................... पृ.१४
वसुंधरा देवधर, विलेपार्ले, मुंबई


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२ ते ३), **सभासद वृत्त** (पृ.३ ते ४), आणि **विवाह सहाय्य** (पृ.५) **ही नेहमीची सदरे.**

बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)